सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १५० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ८ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# विरोध झुगारला, मराठी माणूस एकवटला अखेर मीरारोडमध्ये प्रचंड संख्येत निघाला मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई**

परप्रांतीय व्यापाऱ्यांनी काढलेल्या मोर्चाविरोधात मराठी भाषिकांकडून मीरारोडमध्ये मोर्चाची हाक देण्यात आली. या मोर्चात मनसे, उद्धवसेना, मराठी एकीकरण समितीसह विविध मराठी भाषिक संघटना रस्त्यावर उतरणार होत्या. मात्र या मोर्चाला पोलिसांकडून परवानगी नाकारण्यात आली. त्याशिवाय मोर्चाचे नेतृत्व करणाऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. अनेकांना नोटीस बजावल्या होत्या. १० वाजता मोर्चा स्थळी कार्यकर्ते जमू लागले तेव्हा पोलिसांकडून आंदोलकांची धरपकड सुरू झाली. त्यातूनच मीरारोडमध्ये संघर्ष वाढला. या सर्व विरोधाला झुगारून मराठी माणसांनी मोठ्या संख्येने मोर्चाला हजेरी लावली आणि मोर्चाला सुरूवात झाली.



या मोर्चावेळी आंदोलकांनी मराठीचा जयघोष करत सरकारविरोधात घोषणाबाजी केली. पोलिसांनी कितीही अडवले तरी मोर्चा होणारच असा पवित्रा आंदोलकांनी घेतला. पोलिसांनी मोर्चा रोखण्याचा प्रयत्न केला परंतु मोर्चातील लोकांच्या संख्येमुळे त्यांना अडवणे अशक्य झाले. या मोर्चात मनसे, उद्धवसेना, मराठी एकीकरण समितीचे कार्यकर्ते यांनी हजेरी लावली. डोक्यावर पांढरी गांधी टोपी आणि हातात शिवरायांचा भगवा झेंडा घेऊन मोर्चेकरी त्यांनी ठरवलेल्या मार्गावरून मोर्चात चालत होते. या मोर्चात आलेले मनसे नेते अभिजीत पानसे म्हणाले की, आम्हाला मराठी माणसांचा अभिमान आहे. आज या मोर्चात प्रत्येक मराठी माणसाने हजेरी लावली. पोलिसांनी नेत्यांना अटक केली. दडपशाही करण्यात आली. कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले गेले तरीही मराठी माणूस एकवटला. फक्त मीरारोड नव्हे तर राज्यातून जेव्हा मराठी माणसे इथे यायला सुरूवात झाली तेव्हा सरकार घाबरले. मराठी माणसांची एकजूट यापुढे अशीच कायम राहील असं त्यांनी म्हटलं.खेर मीरारोडमध्ये प्रचंड संख्येत मोर्चा निघाला.

**मंत्री प्रताप सरनाईक यांना प्रचंड विरोध**

दरम्यान, मंत्री प्रताप सरनाईक जेव्हा या मोर्चात पोहचले तेव्हा मोठ्या संख्येने त्यांना विरोधाला सामना करावा लागला. मंत्र्यांनी इथून निघून जावे अशी घोषणाबाजी संतप्त कार्यकर्त्यांनी केली. परंतु काही लोक या मोर्चात राजकारण करत आहेत असा आरोप मंत्री प्रताप सरनाईक यांनी केला. उबाठा आणि मनसेचे हे राजकारण सुरूच राहणार आहे. मी मीरा-भाईंदरमधील लोकांसोबत राहणार आहे असं सरनाईक यांनी म्हटलं.

# मनसेच्या पदाधिकारी, नेत्यांकडून जाणीवपूर्वक वेगळ्या मार्गाचा आग्रह

## देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले परवानगी नाकारण्याचे कारण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई**

राज्यामध्ये कोणीही मोर्चाला परवानगी मागितली की, आपण परवानगी देत असतो. मात्र या संदर्भात मला आयुक्तांनी सांगितले की, मनसे सोबत रोज या संदर्भात चर्चा सुरू होती. परंतु ते जाणीवपूर्वक अशा प्रकारचा मार्ग मागत होते की, ज्यातून संघर्ष निर्माण होईल. मात्र, पोलिसांचे म्हणणे असेही होते की, या संदर्भात अनेक लोकांच्या संदर्भात काही इन पुट आले होते. त्यांना वेगळ्या प्रकारची कारवाई करायची होती. त्यामुळे पोलिसांनी त्यांना नेहमीचा मार्ग घेण्याचे आवाहन केले होते. मात्र मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी त्याला नकार दिला. तसेच आम्ही तोच मार्ग घेणार, अशी भूमिका घेतली. म्हणून पोलिसांनी मोर्चाला परवानगी नाकारली असल्याचे मला आयुक्तांनी सांगितले आहे, असे देखील मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्रामध्ये मनसेच काय तर कोणालाही मोर्चा काढायचा असेल आणि परवानगी हवी असेल तर ती परवानगी मिळेल. मात्र आम्हाला इथेच मोर्चा काढायचा आहे, असाच काढायचा आहे, अशा पद्धतीने कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न झाला तर ते योग्य नाही. शेवटी आपल्या सर्वांना एकाच राज्यामध्ये एकत्रित राहायचे आहे. आपल्या राज्याचा विकासाचा विचार करायचा आहे. योग्य मार्ग देऊन त्यांनी जर परवानगी मागितली, तर ती परवानगी कधीही मिळेल, आजही मिळेल आणि उद्याही मिळेल, असे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.



मनसेचा मोर्चा जर नेहमीच्या मार्गावर निघाला तर परवानगी दिली जाईल. मात्र, ज्या मार्गावर मोर्चा काढणे कठीण आहे, अशाच मार्गाची मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली होती. इतकेच नाही तर त्यांनी सभेसाठी परवानगी मागितली होती, ती देखील परवानगी त्यांना देण्यात आली होती. मात्र त्यांना कायदा सुव्यवस्थेचा विषय निर्माण झाला असता, अशाच ठिकाणी मोर्चा काढायचा होता. इतक्या वर्षापासून आपण मोर्चे काढत आहोत. त्यासाठी आपण पोलिसांची चर्चा करून मार्ग काढत असतो. असे देखील फडणवीस यांनी म्हटले आहे.

# गडचिरोलीत पुराचा कहर: १६ मार्ग बंद, नद्या इशारा पातळीजवळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८गडचिरोली**

दोन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे गडचिरोली जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले असून पूर आल्याने १६ मार्ग बंद झाले आहे. उत्तर गडचिरोलीतील देसाईगंज उपविभागाला पावसाचा सर्वाधिक तडाका बसला आहे. बहुतांश नद्या दुथडी भरून वाहत असल्याने इशारा पातळीजवळ पोहोचल्या असून नदी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

गडचिरोली जिल्ह्याला दरवर्षी पावसामुळे मोठे नुकसान झेलावे लागते. यंदाही जुलैच्या पहिल्याच आठवड्यात पडलेल्या मुसळधार पावसामुळे सर्वत्र पूरस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे देसाईगंज, कुरखेडा उपविभागातील १६ मार्गावरील रहदारी बंद झाली आहे.



सोमवार रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू असल्याने पूरस्थिती आणखी बिकट होण्याची चिन्हे आहे. सोबतच गोसेखुर्द धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आल्याने जिल्ह्यातील मुख्य वैनगंगा नदीच्या पातळीत वाढ होत आहे. त्यामुळे आणखी काही मार्ग बंद होऊ शकतात. तर काही नद्या इशारा पातळीच्याजवळ पोहोचल्या आहे. खबरदारी म्हणून जिल्हा व राज्य आपत्ती व्यवस्थापनाच्या चमूला तयारीची सूचना देण्यात आली आहे. पावसाचा सर्वाधिक तडाखा कुरखेडा तालुक्याला बसलेला आहे. येंगलखेडा लघु सिंचन प्रकल्प देखील भरल्याने विसर्ग वाढविण्यात आला आहे. यामुळे नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेत पूरस्थितीचा आढावा घेतला असून आपत्ती निवारणासाठी प्रशासनाला सूचना केल्या आहे.

जिल्ह्यात सुरु असलेल्या मुसळधार पावसासोबतच गोसेखुर्द धरणातून वैनगंगा नदीत मोठ्या प्रमाणात विसर्ग करण्यात येत आहे. यापार्श्वभूमीवर, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी नागरिकांना घाबरू नका, पण सतर्क राहा असे आवाहन करत नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कतेची उपाययोजना राबविण्याचे आदेश आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला दिले आहेत.

**हे मार्ग आहेत पुरामुळे बंद**


कुरखेडा मालेवाडा रस्ता राज्यमार्ग ३६२ (खोब्रागडी नदी), कोरची बोटेकसा भीमपूर रस्ता राज्यमार्ग ३१४ (भीमपूर नाला), कुरखेडा वैरागड रस्ता राज्यमार्ग ३७७, मांगदा ते कलकुली, कढोली ते उराडी, चातगाव रांगी पिसेवाडा, गोठनगडी चांदागड सोनसरी, कुरखेडा तळेगाव चारभट्टी, आंधळी नैनपुर (सती नदी) शंकरपूर जोगीसाखरा कोरेगाव चोप, आष्टी -उसेगाव-कोकडी -तुलसी-कोरेगाव, मालेवाडा-खोब्रामेंढा, वैरागड-देलनवाडी, चौडमपल्ली-चपराळा, सावरगाव-गारपट्टी-कोटगुल, अरसोडा कोंढाळा-कुरूड - वडसा हे १६ मार्ग बंद आहेत.

# विरोधी पक्षनेतेपदावरून विधानसभेत विरोधकांचा सभात्याग; अजून किती काळ विचार करणार? विरोधकांचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई**

पावसाळी अधिवेशनात आज सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांचा महाराष्ट्र विधान भवनात दुपारी दोन वाजता राज्य सरकारकडून सत्कार करण्यात येणार आहे. दरम्यान, महाराष्ट्राचे सुपुत्र सरन्यायाधीश भूषण गवई यांचा आज विधीमंडळात सन्मान करण्यात येत आहे. त्यांच्या स्वागतासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सभापती, उपसभापती, विधान परिषद विरोधी पक्षनेते असतील. पण विधानसभा विरोधी पक्षनेते नसतील. ही बाब सभागृहाला भूषणावह नाही. त्यामुळं विरोधी पक्षनेतेपदावरून विधानसभेत विरोधक आक्रमक होत सभात्याग केला.

आज महाराष्ट्राचे सुपुत्र सरन्यायाधीश भूषण गवई यांचा आज विधीमंडळात सत्कार होत आहे. हे आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. पण यावेळी विरोधी पक्षाची खुर्ची खाली असणार, त्यामुळं विरोधी पक्षनेते पदाचा निर्णय लवकर विधानसभा अध्यक्षांनी घ्यावा, असं आमदार भास्कर जाधव यांनी सांगितलं. तर मी सर्व घटना आणि कायद्याचा विचार करून यावर योग्य वेळी निर्णय घेईल. याचा सर्वस्वी निर्णय घेण्याचा अधिकार हा मला आहे. त्यामुळं योग्य वेळी योग्य निर्णय घेईन, असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटलं आहे. तर दुसरीकडे, विरोधकांनी आताच्या आता विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय घ्या, असं म्हणणं चुकीचं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी सांगितलं.



दरम्यान, यापूर्वीही सरकार स्थापन झाल्यानंतर चार महिन्यानंतर विरोधी पक्षनेते पदाची निवड करण्यात आली आहे. असा दाखला अध्यक्षांनी दिला. मात्र, गेल्या काही महिन्यापासून आपण यावर विचार करत आहेत. पण, निर्णय कोणताही घेत नाहीत. केवळ वेळ घालवत आहात, असं भास्कर जाधव आणि जयंत पाटील यांनी म्हटलं आहे. हे सरकार कसं लोकशाहीचा गळा घोटत आहे. लोकशाही पद्धतीनं काम करत नाही. विरोधकांचा आवाज दाबत आहे आणि सरकार येऊन सहा महिने झाले तरी अजून विरोधी पक्ष नेतेपदाचा निर्णय नाही. आम्ही महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानसभा अध्यक्षांना पत्र देऊनही ते निर्णय घेत नाहीत, त्यामुळं आम्ही सभागृहातून सभात्याग करत सरकारचा निषेध करतो, असं आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले. यावेळी विरोधकांनी आक्रमक होत सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांचा महाराष्ट्र विधानमंडळातर्फे सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई :**

राज्याच्या विधीमंडळात सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्वपक्षीय नेते, आमदार उपस्थित होते. सत्कार स्वीकारत सरन्यायाधीश भूषण गवई यांनी आभार मानले.

महाराष्ट्राच्या विधीमंडळाशी वडिलांचे ३० वर्षांचे नाते होते. आता याच इमारतीत सत्कार स्वीकारतोय, असे सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, भारताचे समाजकल्याण राज्यमंत्री रामदास आठवले, महाराष्ट्राचे विधान कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेच्या उपाध्यक्ष नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, मंचावर उपस्थितीत दोन्ही सभागृहाचे गटनेते आणि प्रतोद, मंत्रिमंडळातील सर्व सन्मानीय सदस्य, विधान परिषद



आणि विधानसभेचे सदस्य आणि माजी सदस्य, बहु असोत सुंदर संपन्न की महा । प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा, या शब्दात सरन्यायाधीश भूषण गवई यांनी भाषण सुरू केले. सरन्यायाधीशांच्या भाषणाची सुरुवात ऐकून उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

मी महाराष्ट्रत जिथे जिथे काम केलं होतं तिथे सत्कार स्वीकारणार असं ठरवलं होतं. छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर... हा शेवटचा सत्कार समारंभ आहे. पण याचं महत्त्व माझ्या मते अनन्यसाधारण असं आहे. हा फक्त दोन्ही सभागृहांच्या सदस्यांनी केलेला बहुमान नसून महाराष्ट्राच्या बारा कोटी ८७ लाख जनतेचा मला मिळालेला आशीर्वाद आहे. असं मी समजतो. सर्वप्रथम महाराष्ट्राच्या जनतेला आणि महाराष्ट्राच्या मातीला वंदन करतो, असं सरन्यायाधीश भूषण गवई म्हणाले.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या कार्याचे गौरवोद्गार**

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आजचा हा क्षण अतिशय आनंदाचा आहे, महाराष्ट्राचे सुपुत्र भूषण गवई हे भारताचे सरन्यायाधीश झाले. त्यामुळे आपल्या विधिमंडळाने निर्णय घेतला की त्यांचा सत्कार करावा. विधिमंडळातर्फे म्हणजे महाराष्ट्राच्या जनतेकडून यह सत्कार असल्याचे फडणवीस म्हणाले.पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, त्यांच्यातील साधेपणा असा की मी अध्यक्षांना विचारले की तुम्ही जाऊन गवई साहेबांना निमंत्रित केले की नाही? त्यावेळेस अध्यक्षांनी सांगितले की गवई साहेबांना निमंत्रण देण्यासाठी कॉल केला, तेव्हा गवई साहेबांनी सांगितले की तुमचे निमंत्रण मला मिळाले असे समजा. फॉरमॅलिटीची आवश्यकता नाही. मला असे वाटते की त्यांच्यामध्ये हा जो काही साधेपणा आहे, आपल्यापैकी अनेकांचा संबंध त्यांचे वडील दादासाहेब गवई यांच्याशी आलेला असेल. दादासाहेब गवई हे प्रचंड बुद्धिमत्ता असलेले व सर्वांशी अतिशय चांगले संबंध असलेले असे दादासाहेब होते. तोच गुण हा माननीय गवई साहेबांनी घेतला आहे. सरन्यायाधीश आहेत, पण ते कधी कोशात गेले नाहीत.

## संपादकीय ......

# परतवारी..!

बा विठ्ठला, तुझी कृपा आम्हावरी अशीच असू दे. बर्यापैकी वारी निर्विघ्नपणे पार पडल्यानंतर वारकरी मंडळी गावाकडील प्रवासाला लागली आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही परतवारी सुद्धा निर्विघ्न होऊ दे एवढीच तुझ्या चरणी प्रार्थना. हालअपेष्टा यांची पर्वा न करता तुझ्या दर्शनाच्या ओढीने अक्षरशः लाखो वारकरी गावागावांतून पंढरीच्या दिशेने आले. कुणाला आजोबांनी नेम घालून दिला होता, तर कुणाला वडिलांनी, तर कुणाची पिढ्यान्पिढ्यांची प्रथा होती. ही प्रथा जपण्यासाठी गावोगावची मंडळी तुझ्या दर्शनार्थ पंढरीला आली आणि कळसाचे दर्शन घेऊन तृप्त होऊन परतीला लागली. हा परतीचा प्रवास पण सुखाचा होऊ दे रे बाबा. नुकतेच परतीच्या प्रवासात एका दाम्पत्याचे अपघाती निधन झाले. कुठे वाहनांना अपघात होतात आणि वारकरी दगावतात. काहीही करून हे तत्काळ थांबव रे विठ्ठला!

खरिपाची शेतीची कामे जेमतेम आटोपून मंडळी सुमारे वीस ते पंचवीस दिवस चालत तुझ्या दर्शनाला येतात. वारी जिथून जाते त्या देहू - आळंदी या परिसरात नित्यनेमाने पाऊस पडतो. परंतु तुझा भक्त समुदाय महाराष्ट्राच्या विविध भागांत विखुरलेला आहे. वारकरी वारीला आलेला असताना त्याच्या शेतात पाऊस पाडून त्याला सुखद धक्का दे रे पांडुरंगा. ज्यांनी पेरणी केली आहे ते वारी संपवून परत शेतामध्ये जातील तेव्हा त्यांची पिके किमान हातभर वर आलेली त्यांना दिसू दे, हीच तुझी कृपा असणार आहे. 'शेतकरी सुखी तर जग सुखी' असा आपला मूलमंत्रच आहे. पिकविणारा गलितगात्र झाला तर लोकांना धान्य खाऊ कोण घालणार, हा एक मोठाच प्रश्न असतो. या बळीराजाला बळ देण्याचे काम करण्याची जबाबदारी तुझीच आहे रे विठ्ठला. तू तेवढी पूर्ण कर, एवढीच तुझ्या चरणी आमची विनंती आहे.

शेतामध्ये इतके भरघोस पीक येऊ दे आणि त्याचबरोबर शेतमालाला इतका भाव मिळू दे, जेणेकरून आमचा बळीराजा कर्जाच्या सापळ्यातून बाहेर येईल. त्याच्या गळ्याभोवती बसलेला कर्जाचा फास प्रत्यक्ष फासामध्ये कधी परावर्तित होईल हे सांगता येत नाही. यासाठी तूच त्याला शक्ती दे ही तुझ्या चरणी प्रार्थना. आमची सुख-दु:खं आम्ही सांगायची तरी कुणाला? तूच तारणहार आणि तूच आमचा त्राता आहेस, तारणहार आहेस. त्यामुळे तुझ्याच कृपेची विनंती आम्ही करू शकतो. कारण आमच्याकडे अन्य कुणीही कोणताही तरणोपाय नाही. बा विठ्ठला, आणखी एक कर. शेतकर्यांना वेळेवर बी-बियाणे आणि खते उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित लोकांना बुद्धी दे, जेणेकरून शेती करणे सुखावह होईल. निसर्गाच्या अस्मानीला तोंड देता देता शेतकरी थकला आहे. त्याला ऊर्जा देण्याचे काम तुलाच करावे लागणार आहे विठ्ठला.चंद्रभागेच्या तीरी उभे असलेले तुझे लोभसवाणे रूप डोळ्यात साठवून वर्षभराची बेगमी करत वारकरी आता गावी परतत आहे. भाजीमध्ये विठ्ठलाचे दर्शन घेणारे संत सावता असोत की संत ज्ञानेश्वर वा जगद्गुरू तुकोबाराय असोत, यांनी आमच्यावर वारीचे मजबूत संस्कार केले आहेत.

# नागपूर-अमरावती जिल्ह्यातील वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधांची कामे गतीने करा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भविष्यातील लोकसंख्येसाठी वीज मागणीचे आताच नियोजन करा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८मुंबई-** नागपूर व अमरावती जिल्ह्यात उद्योग, निवासी प्रकल्प आणि वाणिज्य क्षेत्रामुळे वीज मागणी झपाट्याने वाढते आहे. नागपूर व अमरावती मधील विज कामांसाठी मंजूर निधीतील कामे गतीने करा. तसेच सन २०३५






मध्ये भविष्यातील वाढणारी लोकसंख्या लक्षात वीज मागणीची आताच नियोजन करा, दोन्ही जिल्ह्यात वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास आराखडा तयार करा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विधानभवन येथे नागपूर जिल्हा महावितरण आणि महापारेषण आढावा तसेच कोराडी, खापरखेडा प्रकल्पांसंदर्भात आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. या बैठकीला महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे,वित्त राज्यमंत्री ड आशिष जयस्वाल,ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर,आमदार आशिष देशमुख,आमदार मोहन मते,आमदार प्रविण दटके,आमदार चरणसिंग ठाकूर यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नागपूर जिल्ह्यामध्ये वीज क्षेत्रातील वाढती मागणी वाढत आहे. विविध पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढली असून विजेची मागणी देखील वाढत आहे. नागपूर व अमरावती जिल्हयासाठी मंजूर वीज क्षेत्रातील विकासासाठी सध्या मंजूर निधीतून कामे पूर्ण करावीत आगामी कालावधीत अजनुही नवीन विविध प्रकल्प वाढत आहेत त्यासाठी ऊर्जा विभागाने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे.नागपूर मध्ये ७१३ कोटी तर अमरावती जिल्ह्यात २४२ कोटी रूपयांचे वीज क्षेत्रातील कामांसाठी निधीची आवश्यकता भासणार आहे या निधीची तरतूद करण्यात यावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,विविध यंत्रणांकडून होणारे भुमिगत केबलचे नुकसान टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात करणे गरजेचे आहे. जिल्ह्यात नवीन होणा-या प्रकल्पांमुळे वीज वितरण क्षेत्रातील वायरिंगचे नुकसान टाळण्यासाठी सुरक्षित केबल डक्ट वापरावेत जेणेकरून वीज वितरण केलेल्या वायरिंग सुरक्षित राहील. सुधारित वीज क्षेत्र योजना,कुसुम-ब योजना,मागेल त्याला सौर कृषीं पंप योजना,ट्रान्सफॉर्मर क्षमतेत वाढ व नव्या वीज केंद्रांची उभारणी,नवीन वीज उपकेंद्राची मागणी या कामांना प्राधान्य देण्यात यावे.

या बैठकीला मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव ऊर्जा आभा शुक्ला, सचिव श्रीकर परदेशी, पर्यावरण तथा वातावरणीय बदल सचिव जयश्री भोज,महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक डॉ संजीव कुमार,महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ राधाकृष्णन बी.महाऊर्जा विकास संस्थेच्या महासंचालक डॉ.कांदबरी बलकवडे यासह दूरदृश्य प्रणाली द्वारे नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. बिपिन ईटनकर यांच्यासह इतर अधिकारी बैठकीला उपस्थित होते.-

# कांद्याचे चांगले रोप तयार होण्यासाठी रोपवाटिकेत 'या' गोष्टी करा, वाचा सविस्तर

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक -** खरिपातील कांदा लागवडीसाठी रोपवाटिका तयार करण्याचे काम सुरु झाले आहे. अनेक शेतकरी रोपवाटिका तयार करण्यात व्यस्त आहेत. सक्षम रोपवाटिका तयार केली तर उत्पादन देखील चांगले होते. म्हणून रोपवाटिका व्यवस्थापन करताना काय काळजी घेतली पाहिजे, हे पाहुयात....




एक एकर कांदा लागवडीसाठी २ गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका तयार करावी.

एक एकर लागवडीसाठी २-३ किलो बी पुरेसे होते.

पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २ ग्रॅम कार्बेन्डाझीम हे बुरशीनाशक चोळावे.

पेरणीपूर्वी २०० किलो शेणखतासोबत ५०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हीरिडी वापरून जमिनीत मिसळावे. रोपवाटिकेस सुरुवातीला झारीने पाणी द्यावे, नंतर पाटपाणी दिले तरी चालू शकते.

रोपवाटिकेत ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धती वापरण्यासाठी जमिनीपासून १०-१५ सें.मी. उंच, १-१२ मीटर रुंद आणि गरजेनुसार लांब गादीवाफे जमिनीच्या उताराला आडवे तयार करावेत. त्यामुळे रोपांची वाढ एकसारखी होते. पाणी फार काळ साचून राहत नाही, त्यामुळे रोपे कुजत किंवा सडत नाहीत. तसेच लावणीच्या वेळी रोपे सहज उपटून काढता येतात. रोपांच्या गाठी जाड व लवकर तयार होतात. वाफे तयार करताना १६०० ग्रॅम नत्र, ४०० ग्रॅम पालाश प्रति २०० वर्ग मीटर याप्रमाणात खते द्यावीत, रुंदीशी समांतर ५-७.५ से. मी. अंतरावर रेघा पाडून १-१.५ सें. मी. खोलीवर बियाणे पेरावे.

पेरणीनंतर चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खताने बियाणे झाकावे. नंतर झारीने जेमतेम वाफ्यावर फिरेल अशा पध्दतीने पाणी द्यावे, तण



नियंत्रणासाठी रोपे उगण्यापुर्वी वाफ्यावर पेंडीमिथैलीन २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पेरणीनंतर २० दिवसांनी हाताने खुरपणी करून, ८०० ग्रॅम प्रति २०० वर्ग मीटर या प्रमाणात नत्र द्यावे.**- ग्रामीण मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी**

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बॅंकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# तुमच्या लघवीचा रंग सांगतो, आजारी आहात की नाही!

**दि.८विदर्भ प्रजासत्ताक**

लघवीच्या माध्यमातून आपल्या शरीरामधील जास्तीचं पाणी बाहेर पडतं. सामन्यापणे लघवीचा रंग हा हलक पिवळा असतो. पण जर लघवीचा रंग बदलला तर आरोग्य धोक्यात येऊ शकतं.




## चाळिशीच्या आतील ५० टक्के रुग्ण हृदयरोगाशी संबंधित

लघवीचा रंग गडद



पिवळा किंवा नारिंगी असेल तर ते निर्जलीकरणाचे संकेत असू शकते. याचा अर्थ मूत्रपिंडावर अतिरिक्त दबाव आहे. यामुळे दीर्घकालीन मूत्रपिंड रोग (उघऊ) होण्याचा धोका वाढतो.

लघवीचा रंग लाल किंवा गुलाबी असेल तर लघवीत रक्ताचे लक्षण आहे. हे संसर्ग, मूत्रपिंड किंवा ग्लोमेरुलर रोग यासारख्या गंभीर मूत्रपिंडाच्या समस्येचे संकेत असू शकते.

लघवीमध्ये फेस असेल तर याचा अर्थ असा की त्यात प्रथिनांचे प्रमाण जास्त आहे. हे मूत्रपिंड फिल्टर (ग्लोमेरुली) खराब होण्याचे संकेत आहे. हे दीर्घकालीन मूत्रपिंड रोगाचे मुख्य लक्षण आहे.

काही लोकांमध्ये तपकिरी रंगाचे मूत्र असते. हे रक्तात मायोग्लोबिन (स्नायू प्रथिने) किंवा बिलीरुबिनची उपस्थिती दर्शवते, जे मूत्रपिंड किंवा यकृताची गंभीर समस्या दर्शवते. हे मूत्रपिंडाच्या नुकसानाचे धोकादायक लक्षण मानले जाते.

एखाद्याच्या लघवीचा रंग हिरवा किंवा निळा असेल तर तो मूत्रमार्गाच्या संसर्गामुळे (णढख) किंवा काही औषधे/फूड कलरमुळे असू शकतो. हे किडनीवर परिणाम करणाऱ्या बॅक्टेरियाच्या संसर्गाचे देखील संकेत देऊ शकते.

# निवृत्तीवेतन नियमित चालू राहिल कोषागार कार्यालयाचे स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती-** निवृत्ती वेतन फॉर्म सादर केला नसल्यास निवृत्तीवेतन बंद होणार आहे, अशी अफवा समाजमाध्यमातून पसरविण्यात येत आहे. यात कोणतेही तथ्य नसून निवृत्तीवेतन नियमित सुरू राहणार आहे, असे स्पष्टीकरण जिल्हा कोषागार कार्यालयाने दिले आहे. व्हॉट्स प आणि इतर प्रसार माध्यमातून निवृत्ती वेतन फॉर्म सादर केला नसल्यास माहे जुलैपासून निवृत्ती वेतन बंद होणार आहे, असे संदेश व्हॉट्स प व इतर समाज माध्यमावर प्रसारीत होत आहेत. कोषागारामधून निवृत्ती वेतन स्विकारत असलेल्या राज्य शासनाच्या सर्व निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतन धारकांनी या अफवांवर विश्वास ठेवू नये. निवृत्ती वेतन बंद करण्याबाबत शासनाकडून कोणत्याही सुचना कोषागारास प्राप्त झालेल्या



नाहीत. त्यामुळे निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतनधारकांना नियमित निवृत्ती वेतन चालू राहील. यासाठी कोषागार कार्यालयास भेट देण्याची गरज नाही. याची नोंद राज्य शासनाच्या सर्व निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्ती वेतन धाराकांनी घ्यावी, असे आवाहन कोषागार अधिकारी अमोल इखे यांनी केले आहे.

# संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती-** रविवारी रात्रीपासून अमरावती शहर आणि जिल्ह्यात सुरू असलेला पाऊस सोमवारी दिवसभर कधी रिमझिम तर कधी हलक्या स्वरूपाचा सुरूच होता. हवामान विभागाने सोमवारला रात्रीपासून पुढील चोवीस तासात अमरावती शहरासह जिल्ह्यातील बहुतांश भागात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसेच मंगळवार आणि बुधवारी अमरावतीमध्ये ऑरेंज अलर्ट जाहीर केला आहे. राज्य सरकारने पुढील २४ तासांत अमरावती, भंडारा, नागपूर, वर्धा येथे काही ठिकाणी मुसळधार पाऊस आणि काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

हवामानशाखज्ञ प्रा. अनिल बंड यांनीमाहिती देताना सांगितले की, चक्रीवादळ वाऱ्यांच्या प्रभावामुळे पश्चिम बंगालच्या गंगा क्षेत्रात ७.८ किलोमीटर उंचीवर कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. जे दक्षिणेकडे झुकलेले होते. पुढील दोन-तीन दिवसांत हे कमी दाबाचे क्षेत्र छत्तीसगड आणि झारखंडकडे सरकण्याची शक्यता आहे.गेल्या दोन दिवसात अमरावती शहरात १४५.७मी.मी.पावसाची नोंद झाली असून आजही सकाळ पासून पाऊस कोसळत आहे.शहरातील महादेव खोरी, संजय गांधी नगर, यशोदा नगर, पंचशील नगर, शहरातील मुस्लिम बहुल भागातील सखल भाग असलेल्या परिसरात पाणी साचत आहे.अनेक ठिकाणी गटार तुंबत असून पाण्याचा निचरा संथगतीने होत आहे. वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे. पावसामुळे वातावरणात गारठा निर्माण झाला आहे. नागरिक जर्किन, रेनकोट, दिसत आहेत. शहरातील हातगाड्यांवर किरकोळ व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांना संततधार पावसामुळे आपला व्यवसाय बंद ठेवावा लागला आहे.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ८ जुलै २०२५

शहर/ग्रामिण

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा


# मनपा आयुक्तांचे शासकीय वाहन जाणार भंगारात

## ४ कार व ८ हॅड्रोलीक ऑटोंचा स्क्रॅबसाठी लिलाव

### मनपा आयुक्तांसाठी ५० हजार रू. महिन्याने भाड्याचे वाहन

### अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, शहर अभियंत्यांसाठीही येणार वाहने

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती,**-दहा वर्षापूर्वी विकत घेतलेल्या सर्व वाहनांचा स्क्रॅबमध्ये लिलाव करावा, असे शासनाचे आदेश धडकले आहेत. त्यानंतर महानगर पालिकेने मनपा आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त व शहर अभियंत्यांचे शासकीय वाहन व आरोग्य विभागाने विकत घेतलेल्या ८ हँड्रोलीक ऑटोंचा स्क्रॅबसाठी लिलाव करण्याचा निर्णय घेतला आहे. अधिकाऱ्यांना पर्यायी व्यवस्था म्हणून मनपाने आयुक्त सौम्या शर्मा यांच्यासाठी प्रतिमाह ५० हजार रूपये भाड्याने हायक्रॉस इनोव्हा वाहन भाड्याने घेतले आहे. त्याचप्रमाणे अतिरिक्त आयुक्त, प्रशासन विभागाच्या उपायुक्त व शहर अभियंत्यांसाठी सुध्दा लवकरच भाड्याने तीन कार घेणार असल्याची माहिती विश्वसनीय सुत्रांकडून मिळाली आहे.माहितीनुसार, आतापर्यंत मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्यासाठी एमएच-२७-एए-८००८ शासकीय होण्डा सिटी कार होती. तर अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्यासाठी एमएच-२७-एए-७००७क्रमांकाची हुण्डाई वर्ना, प्रशासन उपायुक्त मेघना वासनकर यांच्याकडे एमएच-२७-एए-०६५० टोयोटा इँटॉस, प्रभारी शहर अभियंता रवींद्र पवार यांच्यासाठी एमएच-२७-एए-०७२० इँटॉस कार होती. ही सर्व वाहने मनपाने सन २०१५ साली खरेदी केली होती. त्याच प्रमाणे आरोग्य विभागाने सन २०१३ साली लाखो रूपये किमतीचे ८ हॅड्रोलीक ऑटो सुध्दा विकत घेतले होते. अशातच आता दहा वर्ष जुन्या वाहनांचा स्क्रॅबसाठी लिलाव करण्याचे शासनाचे आदेश आहे.




त्यानुसार मनपाने आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, शहर अभियंत्यांच्या आतापर्यंत सेवेत असलेली ४ वाहने व ८ हॅड्रॉलीक ऑटो अशा एकूण १२ वाहनांचा ई-लिलाव करून सर्व वाहने स्क्रॅबला देण्यात येणार आहे. याबाबत मनपा सर्व वाहनांना स्क्रॅबमध्ये देण्यासाठी आरटीओची परवानगी सुध्दा घेणार आहे. हॉयक्रॉस इनोव्हा मनपा आयुक्त शर्मा यांच्यासाठी ५० हजार रूपये प्रतिमाह नुसार भाड्याने घेतली.

याव्यतिरिक्त अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त व शहर अभियंत्यासाठी ३ कार कंत्राटदारांकडून प्रतिमाह नुसार भाडे तत्वावर घेणार आहे. याबाबत मनपाच्या संबधीत विभागाने कंत्राटदाराला पत्र सुध्दा दिले आहे. लवकरच तिन्ही कार मनपा अधिकाऱ्यांच्या सेवेत हजर होतील.

# प्रत्येक शेतकऱ्यांना शेतकरी गटाला जोडणार-जिल्हाधिकारी येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती,** -शेतीची उत्पादकता वाढवून उत्पन्न दुप्पट करण्यासाठी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती होणे गरजेचे आहे. राज्यभरात शेतीमध्ये होत असलेले विविध प्रयोग आणि त्यातून वाढलेली उत्पादकता याचा जिल्ह्यात प्रसार होणे आवश्यक आहे. यासाठी महिला बचत गटाप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्यांना जोडण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.कृषी विभागाच्या वतीने राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत उत्पादकता वाढीसाठी कार्यशाळा आणि शेतकऱ्यांचा गौरव कार्यक्रम आज नियोजन भवनात घेण्यात आला. यावेळी कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, आत्माच्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने, रेशिम उपसंचालक महेंद्र ढवळे आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी श्री. येरेकर म्हणाले, शेतकऱ्यांना

## कृषी विभागातर्फे शेतकऱ्यांचा गौरव



मार्गदर्शन करण्याची पूर्ण जबाबदारी कृषी विभागावर आहे. आज शेतीवर ५० टक्के लोकसंख्या अवलंबून असताना केवळ १५ टक्के शेतीतून उत्पादन होत आहे. हे उत्पादन वाढीसाठी विविध तंत्रज्ञान आणि प्रयोग करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी बाजारपेठेचा अभ्यास करून त्यानुसार पिक निवडणे गरजेचे आहे. शेतीचा लागवड खर्च वाढत असताना आर्द्रता पाहून फवारणी केल्यास ३० टक्के औषधांची बचत होत असल्याने या तंत्राचा उपयोग होणे गरजेचे आहे.

जिल्ह्यात संत्रा फळपिकाखाली मोठे क्षेत्र आहे. शेतकऱ्यांच्या स्तरावर फळांचे वर्गीकरण होत असले तरी आता फळांपासून पल्प काढण्याचे तंत्र शेतकऱ्यांनी शिकावे लागणार आहे. यासाठी प्रबोधन होणे गरजेचे आहे. कृषी हा प्राधान्याचा विषय आहे. त्यामुळे जमीन, पिक आणि अनुषंगीक बाबींचा बारकाईने विचार करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन होणे अपेक्षित आहे. कृषी विभागाच्या व्हॉटस्प ग्रुपच्या माध्यमातून दैनंदिन माहिती देण्यात येते. त्याचबरोबर शेतकरी गटाशी प्रत्येक शेतकऱ्याला जोडून तालुका, गावस्तरावर माहिती पोहोचविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना जोडण्याचे काम येत्या काळात हाती घेण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या विकासासाठी कृषी विभागाने स्वयंप्रेरणेने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.शेतीमध्ये उत्कृष्ट कार्य करणारे अमित कुकडे, गौतम गेडाम, राजाभाऊ तिडके, सुभाष तायडे, प्रवीण वैद्य, परशराम भिलावेकर, श्रावण धुर्वे, तोताराम भिलावेकर, स्वप्निल फुंडकर, ओंकार चव्हाण, गजानन गोजरे, संजय सरदार, विनय बोथरा, देविदास ढोके, राहुल निमकर, तुषार माकोडे, शैलेंद्र देशमुख, रूपाली ठाकरे, अतुल खरबडे, प्रफुल सांबरतोडे, सुखराम धुर्वे, सुशील काकडे, ललिता महाजन, निलेश कुरवाडे, अभिषेक आसोले, सहायक कृषी अधिकारी सतीश निमकर, सुनील हर्ले, विनोद बोंडे, ज्योती ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विनय बोथरा यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच अहिल्यानगर येथील राहुल रसाळ यांनी आधुनिक शेती पद्धतीबाबत दूरदृष्यप्रणालीद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी नवीन पिक विमा योनजेच्या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. श्री. सातपुते यांनी प्रास्ताविक केले.-

# जंगल सिमा ओलांडून शहरीवस्तीत पोहोचलेल्या जखमी चितळाचा रेस्क्यू

## वन्यजीव तज्ज्ञ, डॉक्टर्स व वनाधिकाऱ्यांच्या देखरेखीत उपचार आटपून प्राकृतिक जंगल-अरण्यात होणार चितळ मुक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८धारणी-** जंगल सीमा ओलांडून शहरी वस्ती पोहोचले जखमी चितळ प्रादेशिक वनविभागाच्या पथकाकडून सोमवारी रेस्क्यू केले त्यापश्चात स्थानिक पशुसंवर्धन अधिकाऱ्यांमार्फत प्राथमिक उपचार आटपून वन्यजीव तज्ज्ञ, डॉक्टर्स आणि वरिष्ठ वनाधिकाऱ्यांच्या देखरेखीत धारणी येथे आणून ठेवण्यात आले आहे.सध्या त्या जखमी चितळाची प्रकृती स्थीर असून धोक्याबाहेर आहे. वन्यजीव तज्ज्ञ डॉक्टर्स तथा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात येत्या काही तासांनी संबंधित चितळ पुन्हा त्याच्या प्राकृतिक जंगल सीमेत नेवून सोडण्यात येणार असल्याची माहीती धारणीचे प्रभारी वनपरिक्षेत्र अधिकारी तायडे यांनी 'दैनिक हिंदुस्थान' कडे स्पष्ट केली आहे.मेळघाटातील धारणी शहरलगत असणाऱ्या परीसरात सोमवारी जखमी अवस्थेत एक चितल काहींना दिसून आले त्यामुळे हो माहीती संबंधितांकडून लगेच प्रादेशिक वनविभागाच्या धारणी कार्यालयाकडे पुरविण्यात आली.वनविभाग पथकाने लगेच घटनास्थळी पोहोचून कुत्र्यांच्या हल्लूयामुळे जखमी चितळाचा मोठ्या शिताफिपूर्वक रेस्क्यू केला. बचावकार्य पश्चात वनविभाग पथकाने जखमी चितळाच लगेच



घारणी शहरातील पशुसंवर्धन दवाखान्यात आणले. व त्यावर तातडीने उपचार मिळवून घेतले. सध्या चितळाची प्रकृती स्थीर असून धोक्याबाहेर असली तरी चितळास गंभीर दुखापत झाली असून पशुसंवर्धनाच्या डॉक्टर्स चमूकडून रक्तबंबाळ अवस्थेती चितळावर टिचेच देण्यात आले.रगंभीर जखमी झाल्याची पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. अविनाश कांबळे, डॉ जयकुमार पटेल, डॉ. अजय धुर्वे, पन्नालाल जावरकर यांनी जखमी चितळावर उपचार पुरवून त्यास नवीन जीवदान दिले आहेत.विश्वसनीय सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार सोमवारी धारणी वनपरिक्षेत्रातील खारीया बिटची जंगल सीमा ओलांडून कुसुमकोट स्थीत ढाकणा फाट्याजवळ चितळाचा कळप आला होता. त्यामुळे कळपावर अचानक काही गावठी कुत्र्यांनी धाव घेतली. कुळातील अनेक चितळ कुत्र्यांच्या तावडीतून सुटले व परत आपल्या प्राकृतिक जंगल सीमेत परत पोहोचले. पण एक चितळ अशरशः कुत्र्यांच्या तावडीत फसून गंभीर जखमी झाले. सुदैवाने लगेच घटनास्थळी वनपथक पोहोचले व त्या चितळावर वेळीच उपचार मिळाले त्यामुळे चितळाला नवीन जीवदान मिळाले. अलीकडे वन्यजीवांच्या वाढत्या घटनांमुळे वन्यजीवप्रेमी चिंताग्रस्त असून वन्यजीवांच्या सुरक्षेबाबत मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.प्रादेशिक वनविभाग धारणी प्रभारी वनपरिक्षेत्राधिकारी प्रभारी किरण तायडे यांच्या मार्गदर्शणात बचावकार्य करणाऱ्या रेस्क्यू पथकामध्ये वनरक्षक अक्षय गवई, वनरक्षक राम कोकणे, रहमान शेख तथा इतर वन कर्मचार्यांच्याकडून अथक परिश्रम घेण्यात आल्याची अधिकृत माहीती प्रसार माध्यमां साठी देण्यात आली आहे .वन्यजीव विभागाचे तज्ज्ञ डॉक्टर्स व वरिष्ठ वन अधिकारी यांच्या देखरेखीत येत्या काही तासांनी त्या चितळास त्यांच्या प्राकृतिक जंगल-अरण्य सिमेत मुक्त सौराचारसाठी सोडून देण्यात येणार आहे.

# ७४ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत जाहीर


## ३८ ग्रामपंचायतीवर महिलाराज असणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८दर्यापूर-** दर्यापूर तालुक्यातील ७४ ग्रामपंचायतीचे २०२५ ते २०३० वर्षासाठीचे सरपंच पदाचे सुधारित आरक्षण सोमवारी (दि.७) दुपारी येथील नवीन तहसील कार्यालयात एसडीओ राजेश्वर हांडे, तहसीलदार डॉ. रवींद्रकुमार कानडजे, नायब तहसीलदार प्रविण जमधाडे, महसूल सहाय्यक मंगेश टापरे, प्रफुल्ल बोरखडे यांच्या उपस्थितीत सोडतीद्वारे काढण्यात आले. तसेच लहान मुलीच्या हस्ते चिठ्ठ्या काढून सरपंचपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. दरम्यान सर्वसाधारण सरपंच पदासाठी सर्वसाधारण ३३, नागरिकांचा मागास प्रवर्ग २०, अनुसूचित जातीसाठी १७, अनुसूचित जमातीसाठी ४ अशा पद्धतीने सरपंच पदासाठी एकूण ७४ ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

या सरपंच पदाच्या सोडतीत अनेक फेरबदल झाले असून कही खुशी कही गम अशी स्थिती निर्माण झाली आहे. गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या मातबरांचे स्वप्न धुळीस मिळाले आहे.

तर अनेकांना अनपेक्षित लॉटरी लागल्याचे चित्र आहे. एकूण ७४ ग्रामपंचायतीपैकी ३८



ग्रामपंचायतीवर महीलाराज असणार आहे.

अनुसूचित जमाती :घड़ा, एरंडगाव, टोगलाबाद, गायवाडी.नागरिकांचा मागास प्रवर्ग येवदा, सासन रामापूर, वडनेर गंगाई, अडूळा बाजार, दारापूर, वढाळगव्हण, शिंगणापूर, नांदरण, रामगाव, पिंपळखुट, आमला, नालवाडा, उमरी इतबारपूर, पिंपळोद, जसापूर, लोतवाडा, वडुरा, माहुली धांडे, सुकळी, भामोद.

सर्वसाधारण प्रवर्ग : सामदा, इटकी, नरदोडा, उपराई, वरुड बु, धामोडी, घोडचंदी, चांडोळा, रुस्तमपूर, गोळेगांव, हिंगणीमिर्झापूर, मार्कंडा, खैरी, नायगाव, महिमापूर, कळाशी, बेलोरा, खल्लार, आराळा, बोराळा, चंडीकापूर, नादेड बु, सासन बु, जैनपूर, पनोरा, म्हैसपूर मोचर्डा, सांगवा बु., नरशिगपूर, रामतीर्थ, डोंगरगाव, लेहगाव, शिरजदा, ऊमरी ममदाबाद.

### ग्रामपंचायतनिहाय सरपंचपदाची सोडत

अनुसूचित जातीः पेठ इतबापूर, शिवर बु., तेलखेडा, कळमगव्हाण, नाचोना, सांगळूद, लासूर, माटरगाव, बेबळा बु., कोळंबी, कान्होली, थिलोरी, टाकळी, करतखेडा, शिगणवाडी, चंद्रपुर, गौरखेडा.

# तिवसा-मोझरी थांबा असणाऱ्या ठिकाणी 'लालपरी' थांबेना

## प्रवाशांमध्ये संतापाची लाट : एस टी महामंडळ विभागाने दखल घेण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८तिवसा-** ग्रामीण भागापासून तर शहरी भागापर्यत धावणाऱ्या एस टी महामंडळाच्या 'लालपरी' ने पूर्वी थांबा असणाऱ्या महत्वाच्या ठिकाणी अचानक लालपरी थांबत नसल्याने प्रवाशांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. श्री क्षेत्र गुरुकुंज मोझरी व तालुका ठिकाण असलेल्या तिवसा या ठिकाणच्या नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे.अमरावतीवरून नागपूरकडे जाणारी एसटी महामंडळाची प्रत्येक बस ही श्री क्षेत्र गुरुकुंज मोझरी व तिवसा याठिकाणी थांबत होती. गुरुकुंज मोझरी आश्रम हे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची पुण्यभूमी आहे, हे ठिकाण म्हणजे शिक्षणाचे माहेरघर आहे. वैद्यकीय अभ्यासक्रम असलेले इ-चड कॉलेज, अध्यापक विद्यालय ऊ

कॉलेज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे समाधीस्थळ, आश्रमिय परिसर, दासटेकडी, आय टी आय कॉलेज, आयुर्वेद रुग्णालय असे सर्व महत्वाचे कॉलेज, स्थळ व येथील



नोकरदार, कर्मचारी वर्ग असल्यानेयाठिकाणचे महत्व लक्ष्यात घेता येथे नागपूर वरून अमरावती व अमरावती वरून नागपूर जाणारी प्रत्येक एस टी बस थांबायची व तसे सुचनाफलक देखील अमरावती बस स्थानकावर दर्शनी भागावर लावण्यात आले होते महामंडळाच्या अनेक लालपरीचेचालक वाहक हे सरळ सरळ लालपरी थांबत नसल्याचे सांगत वादाला पेव फोडत आहे.मोठ्या प्रमाणात विद्यार्थी संख्या, कर्मचारी, शिक्षक, डॉक्टर, व्यावसायिक, नोकरदार यांचा दैनंदिन प्रवास व यातून एस टी महामंडळ विभागाला मिळणारे उत्पन्न या दोन्ही गोष्टी लक्षात घेता गुरुकुंज मोझरी व तिवसा या दोन्ही ठिकाणी लालपरी ला थांबा देण्यात यावा, अशी मागणी प्रवासी जनतेकडून केल्या जात आहे.

### संतप्त प्रवाशी देताहेत आंदोलनाचा ईशारा


वारंवार मोझरी व तिवसा थांब्याला घेऊन लालपरी चे चालक-वाहक यांच्याशी वादाची ठिणगी निर्माण होत आहे. त्यामुळे सातत्याने होणाऱ्या या समस्याची एस टी महामंडळ विभागाने दखल घेऊन निराकरण करावे अन्यथा कोणत्याही क्षणी संतप्त प्रवाशांचा वादाचा भडका आंदोलनात रूपांतरित होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

# विमान सेवा तांत्रिक बिघाडात अडकली अमरावती-मुंबई विमानसेवा वारंवार रद्द का ?

## माजी खा. नवनीत राणा याचा 'एमएडीसी' उपाध्यक्षांना फोनसामान्य विमान प्रवासी प्रचंड त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती** - अमरावती विमानतळावरून गेल्या काही दिवसांपासून विमानांचे उड्डाण रद्द होण्याच्या घटना घडल्या आहेत. या विमानतळावरून उडान योजनेअंतर्गत प्रवासी वाहतूक सेवा सुरू करण्यात आली आहे. विमानाच्या एकूण प्रवासी संख्येच्या पन्नास टक्के प्रवाशांसाठी आमचे सरकार अनुदान देते. पण, जेव्हा येथील व्यापारी किवा उपचारासाठी काही रुग्ण तातडीच्या कामांसाठी विमानाच्या तिकिटांचे बुकिग करतात, काही वेळा विमानाचे उड्डाण रद्द झाले आल्याचे त्यांना कळते. या अमरावती विमाननसेवेसाठी सुमारे ९ ते १० हजार प्रवास भाडे बुकिगच्या वेळी - हा प्रकार काय आहे, अशी विचारणा भाजपच्या नेत्या आणि माजी न खासदार नवनीत राणा यांनी महाराष्ट्र विमानतळ



विकास कंपनीच्या (एमएडीसी) उपाध्यक्ष आणि व्यवस्थापक संचालक स्वाती पांड्ये यांना फोनद्वारे केली.

गेल्या काही दिवसांत अमरावती-मुंबई विमान सेवा तांत्रिक बिघाडात अडकलेली आहे. यामुळे सामान्य विमान प्रवासी खूपच त्रस्त झालेले आहेत. दुसरीकडे, एमएडीसी किवा अलायन्स एअरने हवाई सेवा आणि उड्डाणांबद्दल माहिती देण्यासाठी कोणताही कर्मचारी नियुक्त केलेला नाही. त्यामुळे चौकशी केली तर उडवाउडवीची उत्तरे मिळतात. अशा परिस्थितीत, तांत्रिक कारणांमुळे वारंवार उड्डाणे रद्द करणे आणि नंतर सीट चार्जच्या नावाखाली मोठी रक्कम कापून त्या बदल्यात खूप कमी रक्कम मिळणे यामुळे प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजी आहे.गेल्या एप्रिल महिन्यात बेलोरा - येथील अमरावती विमानतळाचे मोठ्या - थाटामाटात उद्घाटन करण्यात आले. - सुरुवातीच्या टप्प्यात काही काळासाठी - नियमित उड्डाणे निश्चित दिवशी - चालवली जात होती. परंतु त्यानंतर अलायन्स एअरने विविध तांत्रिक कारणे सांगून अचानक उड्डाणे रद्द करण्यास सुरुवात केली. त्यामुळे अमरावती शहर आणि जिल्ह्यातील नागरिकांना विमानाने मुंबईला ये-जा करण्यात खूप गैरसोय होऊ लागली.ज्यांनी अमरावती-मुंबई विमानसेवेसाठी आधीच तिकिटे बुक केली आहेत आणि विमानसेवा रद्द झाल्यावर त्यांना त्यांचे प्रवासाचे नियोजन रद्द करावे लागते किवा प्रवासासाठी इतर पर्याय शोधावे लागतात. तसेच, विमानसेवा रद्द झाल्यावर सीट चार्जच्या नावाखाली त्यांनी भरलेल्या रकमेतून सुमारे एक हजार रुपये कापले जातात आणि उर्वरित रक्कम परत केली जाते. हे विमान प्रवाशांचे थेट आर्थिक नुकसान आहे. गेल्या १६ जून रोजी मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा रद्द करण्यात आली होती. ज्यासाठी काही प्रवाशांनी अमरावती-मुंबई प्रवासासाठी प्रवास तिकिटे खरेदी केली होती परंतु तांत्रिक कारणांमुळे तिकिटे रद्द करण्यात आली.

# युगप्रवर्तक कार्य हे साहित्यातूनचं होऊ शकते- संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. रा. गो. चवरे

## दुसरे परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन उत्साहात संपन्न, विविध राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारांचे थाटात वितरण





**.विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती–**

परिवर्तन प्रबोधिनी, बिलीव्ह फाऊंडेशन व सृजन साहित्य संघ शाखा अमरावती द्वारा आयोजित राज्यस्तरीय दुसरे परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलन अमरावती येथील कांचन रिसॉर्ट मध्ये अतिशय उत्साहात विठू नामाच्या गजरात संपन्न झाले.या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक श्री रा. गो चवरे पुणे, स्वागताध्यक्ष लेखिका व उद्योजिका कांचनताई उल्हे अमरावती तर उदघाटक म्हणून जेष्ठ लेखिका शिलाताई गहलोत अकोला, मिशन आय.ए.एस प्रमुख नरेशचंद्र काठोळे, जेष्ठ समाजसेवक सुदर्शनजी गांग, परिवर्तन प्रबोधिनी अध्यक्ष शोभाताई रोकडे, सचिव रेखाताई बेलसरे, हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी परिवर्तन हे शीर्षक खूप बोलके असून यातील परिवर्तन हा शब्द प्रगतीची, प्रगल्भतेची, अस्मितेची जाणीव करून देणारा आह. मानवाला, समाजाला, राष्ट्राला परिवर्तनाची नितांत आवश्यकता आह. परिवर्तन म्हणजे बदल. हे युगप्रवर्तक कार्य फक्त साहित्यातूनचं होऊ शकते. त्यासाठी वैचारिक प्रगल्भता, निर्भीड वृत्ती व सत्यान्वेशक दृष्टी हवी असते. असे प्रतिपादन संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. रा. गो. चवरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले.अक्षरांच्या ओळीसारखी माणसांची नाती असतात. काळ बदलत आह. त्यामुळे परिवर्तनीय विचारांची गरज असून त्यासाठी साहित्यिकांना आपल्या विचारांचे अस्त्र सज्ज करावे लागेल. असे वक्तव्य जेष्ठ लेखिका शिलाताई गेहलोत यांनी आपल्या उदघाटनीय भाषणातून केले.परिवर्तन ही सहज सोपी वाटणारी गोष्ट नसून त्यासाठी आधी स्वतःमध्ये परिवर्तन करावे लागेल, तरचं आपण समाजाचे परिवर्तन करू शकू. असे वक्तव्य स्वागताध्यक्षा कांचनताई उल्हे यांनी केले.विचार पेरले तरचं ते कृतीतून उतरवता येते आणि त्यातूनचं खरे परिवर्तन घडू शकते असे मत प्रमुख अतिथी शिवाजी चाळक यांनी आपल्या भाषणातून मांडले.तर समाजाच्या परिवर्तनासाठी लेखकांनी एकत्र येऊन निर्भीडपणे लेखन करणे काळाची गरज असल्याचे मत परिवर्तन प्रबोधिनी अध्यक्षा प्रा. डॉ.शोभाताई रोकडे यांनी केले. भव्य अशा ग्रंथदिंडीने साहित्य संमेलनाची यशस्वी सुरुवात संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. रा.गो. चवरे यांचे हस्ते विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथपूजनाने करण्यात आली त्यानंतर संमेलनाचे यथोचित उदघाटन पार पडले. याप्रसंगी जेष्ठ समाजसेवक व साहित्याप्रेमी श्री सुदर्शनजी गांग यांना त्यांच्या सामाजिक कार्यासाठी अमरावती भूषण, तर श्री नरेशचंद्र काठोळे यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी जीवनगौरव पुरस्कार देऊन अध्यक्षांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले. यानंतर लेखिका मीनल येवले, रेखाचित्रकार व लेखक श्री उद्धव शहाणे, साहित्यिक प्रविण बोपुलकर, प्रकाशक सचिन सुकळकर व सुशील सुकळकर, समाजसेवक पुरुषोत्तम गावंडे, संगीततज्ज्ञ प्रा. नयना दापूरकर या विविध क्षेत्रातील मान्यवरांना परिवर्तन स्मृती गौरव देऊन गौरविण्यात आले तर अमरावती जिल्ह्यातील माजी जिल्हा शल्य चिकित्सक व लेखक डॉ.श्यामसुंदर निकम,इंजि. वा. पा. जाधव, इंजि. दीपक दारव्हेकर,वऱ्हाडी लेखक आबासाहेब कडू, लेखिका व अनुवादक डॉ.अनघा सोनखासकर, कवयित्री संजीवनी काळे यांना त्यांच्या साहित्यिक कार्यासाठी परिवर्तन सेवा गौरव हा पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.या प्रसंगी दीपक दारव्हेकर संपादित 'परिवर्तन पर्व' या प्रातिनिधिक काव्य संग्रहाचे तर 'साहित्य प्रवाह' संमेलन विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकांसह वा. पां. जाधव, श्यामसुंदर निकम, आबासाहेब कडू, सौ.आरती झोटींग,संजय महल्ले, प्रेमा लेकुरवाडे,अनघा सोनखासकर, संजीवनी काळे, डॉ. धनश्री मिलके,संजय महल्ले, खुशाल गुल्हाने आदि लेखकांच्या पुस्तकांचे प्रकाशन देखील करण्यात आले. त्यानंतर स्त्रियांवरील अत्याचाराचा अंत कधी? या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. आजची स्त्री ही सुरक्षित नसून स्वरक्षणासाठी स्त्रियांनी स्वतःची काळजी स्वतः घेण्याची गरज आह असे नागपूरच्या रेखा दंडिगे, घिया म्हणाल्या, तर अत्याचाराला स्त्रीचं जबाबदार असून स्त्रियांना सक्षम बनवा त्यांचे सबलीकरण करण्याची गरज पडणार नाही. असे परखड मत डॉ. आशय रोकडे यांनी मांडले, समान अधिकार नसल्याने स्त्रीवादाची चळवळ भरकटली असून आपल्या शिक्षणाचा स्त्रियांनी उपयोग करण्याची गरज आह असे स्पष्ट मत नागपूरच्या सना पंडित यांनी मांडले.सामाजिक कार्य करणाऱ्या महिलांना हिणवू नये असे मत विचारवंत डॉ.श्री राजेंद्र राऊत यांनी मांडले. तर स्त्रियांवरील अत्याचाराचा अंत संघर्षानेचं होईल असे स्पष्ट मत परिसंवाद अध्यक्ष प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांनी मांडले. त्यानंतर निमंत्रितांचा गझल मुशायरा अतिशय बहारदाररित्या संपन्न झाला.

# एसटीची दुचाकीला जबर धडक,पत्नी ठार,पतीसह एकजण जखमी

## पिंपळविहीर नजीकची घटना,लिफ्ट घेणे पडले महागात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ नांदगाव पेठ–**

नागपूरहून अमरावतीकडे येणाऱ्या भरधाव एसटी बसने दुचाकीला दिलेल्या धडकेत एक महिला ठार तर अन्य दोघे जखमी झाल्याची घटना सोमवारी (दि.७ जुलै) दुपारी दीड वाजताच्या दरम्यान पिंपळविहीर या गावाजवळ घडली.विजया राजेश पवार (२८) रा. शेंदोळा असे ठार झालेल्या महिलेचे नाव असून राजेश कमलबाबू पवार (वय ४१, रा. शेंदोळा, जि. अमरावती) व शेख मुख्तार मोहम्मद शमीम (रा. ललतपूर, जि. वैशाली, बिहार) हे दोघे जखमी असून त्यांच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

घटनेची हकीकत अशी की,राजेश पवार व त्यांची पत्नी विजया हे दोघेही शेंदोळा फाट्यावरून अमरावती कडे येत असतांना त्यांनी दुचाकी क्रमांक एम.एच.२७ पी.क्यू ०२०३ या दुचाकी चालकाला थांबवून अमरावती पर्यंत लिफ्ट मागितली. दुचाकी चालक शेख मुख्तार मोहम्मद शमीम याने दुचाकीवर दोघांना बसवून घेतले आणि तिघेही अमरावती कडे निघाले असतांना मागून येणाऱ्या चिमूर अमरावती बस क्र. एम.एच.४०,सी एम.४४१८ ने पिंपळविहिर नजीक दुचाकीला मागून धडक दिली.या अपघातात मागे बसलेली महिला गंभीर जखमी झाली तर महिलेचा पती राजेश व दुचाकी चालक शेख मुख्तार मोहम्मद शमीम हे जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच नांदगाव पेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तिघांनाही अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच विजया पवार यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय चमूने सांगितले.नांदगाव पेठ पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

# गुरुकुंजात गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन

## अ.भा.श्री गुरुदेव सेवा मंडळातर्फे जय्यत तयारी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८गुरुकुंज मोझरी–**

अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही गुरुपौर्णिमा महोत्सवाचे गुरुकुंज आश्रमात आयोजन केले असून या महोत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे.

हा महोत्सव वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या महासमाधी स्थळी १० जुलै रोजी होणार आहे. या पवित्र पर्वावर सर्व गुरुदेव साधक, जिज्ञासू व धर्मप्रेमी यांनी यामध्ये सहभागी होण्याचे संस्थेच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे. गुरूवारी सकाळी महाराजांच्या महासमाधीचे

सर्वाधिकारी लक्ष्मणराव गमे यांच्या हस्ते पूजन करण्यात येणार आहे. सकाळी ५ ते ६ या वेळात सामुदायिक ध्यान व त्यावरील चिंतन प्रचार प्रमुख प्रकाश महाराज वाघ करणार आहे. सकाळी ८ ते ९ या वेळात यावली शहीद येथील श्रीगुरुदेव सेवामंडळ खंजिरी भजनाचा कार्यक्रम सादर करणार आहे.

सकाळी ९ ते १० व १० ते ११ या वेळेत खुशबु कठाणे व निखिल मढावी यांचे अभंग गायन होणार आहे. सकाळी ११ ते १२ या वेळेत धनंजय लोहटे यांचा भक्तीसंगीताचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी १२ ते १ ज्ञानेश्वरी दिदि यांची गुरुमहिमा या विषयावरप्रवचन सादर करतील. दुपारी १ ते २ या वेळेत विवेक गावंडे यांचे अभंग गायन होईल.दुपारी २ ते ३ शिल्पा पाटील यांचा भक्तीगीत गायनाचा कार्यक्रम होणार आहे. दुपारी ३ ते ४ या वेळेत डॉ. प्रशांत ठाकरे यांचे गुरु महात्म्य या विषयावर प्रवचन सादर करतील. दुपारी ४ ते ६ या वेळात बाळासाहेब वाईकर अभंग गायन सादर करतील. सायं. ७ते ७.३० सामुदायिक प्रार्थना व त्यावरील चिंतन ॲड. दिलीप कोहळे हे करतील. सायंकाळी ७.३० वाजता महाआरती व जयघोषाने या कार्यक्रमाची सांगता होणार आहे.–

# मेळघाटात....आता सर्वत्र कटोलेची बहार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८धारणी,**–मेळघाटात पावसाळा लागला की रानभाज्या (जंगली सब्जी) येऊ लागताच उन्हाळा आणि मॉन्सून दरम्यान धारणी तालुक्यात कोयलारी भाजी सर्वांच्यामनपसंतीची असते. आता पाऊस सारखा सुरू झाला. आता ती गेली मात्र कटोले बाजारात उतराच खवय्यांची खाऊ पर्वणी सुरू झालेली आहे.

शहरी भागात कटोल्याची शेती होत असली तरी आमच्या मेळघाटात मात्र अस्सल प्राकृतीक परिस्थितीत कटोले उपलब्ध होत असतात. जगात सर्वात जास्त शक्तीवान भाजी म्हणून रान कटोला समजण्यात येते. हिंदीत ककोडा, कंटोला, काकडा म्हणून ओळखण्यात येणारा कटोला तसा कारल्याच्या जातीचा असला तरी कडू नसतो. पोपटी रंगाच्या कायेलारी रानभाजीचा हंगाम संपताच कटोला बाजारात येत असते. यावर्षी तर कटोल्याने उच्चांक गाठलेला आहे. मागील वर्षी एकशे पन्नास रूपये किलोप्रमाणेबाजारात विक्री झालेला कटोला यावर्षी दोनशे ते अडीचशे पर्यंत धडक मारून आहे. स्वादिष्टआणि दमदार रानभाजी म्हणून मेळघाटात कटोल्याची ओळख आहे. आषाढी एकादशी पासून पोळया पर्यंत जंगलातून आणि पहाडातून कटोले उपलब्ध होतात. शेताच्या डोंगरी धुऱ्यावर आणि झुडपी जंगलात कटोल्याची वेल असते. वेलीला हाताने सरकवल्यावरच लाजाळू कटोले दृष्टीत पडतात अन्यथा कटोला दिसत नाही.मेळघाटात प्रत्येक हंगामात वेगवेगळ्या रानभाज्या, रानफुले, रानवेली आणि रानफळे उपलब्ध होत असतात. टेंभरू फळ, छोटे आवळे, चारोळी, माटचवळी, अम्बाडी, चेरी टमाटे, कोयलारी, ककोडे, गोंदण, केल्हा, भमोडी (रानमशरूम), बकरीचे काम, जंगली मुसळी, टोली (गुल्ली), मोहफुले, हातिया के फुल, जगनी, रानकारले, रानकेळीसह अनेक खास मेळघाटातच उत्पादित होणाऱ्या धान्याचे वाण सुध्दा खवय्यांसाठी उपलब्ध होत असतात. सध्या धारणी बाजारात कटोले येताच हातोहात विकून जात असतात. खरेदी करणाऱ्यांची गर्दी बाजारात दिसत आहे. कटोले पावसाळी रोगांसाठी प्रतिबंधक असतात.

# धारणी खरेदी-विक्री सोसायटीत युरियाचा बंफर स्टॉक, एक सुनियोजित षडयंत्र

## हरिसाल, कळमखार, साद्राबाडी, बैरागड, धावड़ी, मुसर्दा, कटुंगा, टिटम्बा गावात काळा बाजारी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**–पावसाळा सुरू झाल्यापासून मेळघाटातील आदिवासी शेतकऱ्यांना युरिया मिळालेला नाही. स्थानिक खरेदी-विक्री सहकारी संस्थेत युरियाचा बंफर स्टॉक पडलेला आहे. पण, जिल्हाधिकारी कार्यालय व अप्रत्यक्षपणे कृषी विभागाने परवानगी दिलेली नसल्याने मका पेरणाऱ्यांना खुल्या बाजारातून किंवा मध्यप्रदेशातून चारशे रूपये बॅग प्रमाणे युरिया खरेदी करावा लागत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ विकण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी सोसायटीचे अध्यक्ष श्रीपाल पाल यांनी केल्याने एकच खळबळ माजलेली आहे.यावर्षी चिखलदरा-धारणी तालुक्यात सोयाबीन ऐवजी मक्याला जास्त प्राधान्य देण्यात आल्याने शेतकऱ्यांना युरिया आवश्यक झालेला आहे. माहितीनुसार, स्थानिक खरेदी-विक्री सहकारी संस्थेचे स्वःताचे दुकान हे शेतकऱ्यांसाठी फक्त एक दुकान नाही तर सहकार चळवळीला चालना देणारी यंत्रणा समजतली जाते. म्हणून एका महिन्यापासून शेतकरी खुल्या बाजारात युरिया न मागता सोसायटीच्या दुकानात खरेदीसाठी येत आहे. पण, जिल्हाधिकारीकार्यालयाने युरिया व डीएपी विकण्याची परवानगी दिलेली नाही. माल गोदामात पडलेले असूनही विकण्यात येत नसल्यानेसोसायटीच्या दुकानाचे इतर वाण, औषधी, बियाणे, तृणनाशकाची विक्री मंदावून यंदा सोसायटीचाटर्न ओव्हर कमी होण्याचा धोका उभा झालेला आहे. एका माहितीनुसार, तालुक्यातील कळमखार, धावडी, हरिसाल, बैरागड, कुटंगा, सुसर्दा, साद्राबाडी, टिटम्बासह अनेक गावातकाळाबाजारी सुरू आहे. युरियाची परवानगी न देण्यासाठी कृषी विभागाने नियोजितपणे षडयंत्र रचलेले आहे

# रेल्वे ट्रॅक ओलांडणाऱ्या स्कूल बसला रेल्वेने उडवले

## २ विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू, २ गंभीर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८कडलूर :**

– तामिळनाडूच्या कडलूर जिल्ह्यातील सेम्मानकुप्पम गावात आज (दि. ८) सकाळी भीषण अपघात झाला. एक स्कूल बस रेल्वे फाटक ओलांडत असताना, त्याचवेळी तिथून जाणाऱ्या रेल्वेने बसला जोरदार धडक दिली. यात दोन विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघेजण गंभीर जखमी झाले. जखमी विद्यार्थ्यांना तातडीने कडलूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताच्या वेळी बसमध्ये पाच विद्यार्थी होते.

स्कूल बसच्या चालकाने रेल्वे येत असतानाही त्याकडे दुर्लक्ष करून रेल्वे ट्रॅक ओलांडण्याचा प्रयत्न केल्याने हा अपघात घडला. ही धडक इतकी भीषण होती की बसचा चक्काचूर झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि जखमींना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले.

# घरफोडी करणारा सराईत चोरटा जेरबंद, ३.६२ लाखांचा मुद्देमाल जप्त

## बडनेरा पोलिसांची कारवाई

**दि.८अमरावती** –घरफोडी करणाऱ्या एका सराईत चोरट्याला बडनेरा पोलिसांनी सोमवारी (दि.७) दुपारी अटक केली. त्याच्या ताब्यातून रोख रकमेसह ३ लाख ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. विशाल विजय शेंगर (वय २३, रा. भानखेडा खुर्द) असे अटकेतील चोरट्याचे नाव आहे.

पोलीस सुत्रानुसार, भानखेडा खुर्द येथील रहिवासी संजय अंबादास शिंदे (वय ३५) यांनी काही दिवसांपूर्वी त्यांचा साळा सुरेश मांडवकर यांच्याकडून प्लॉट खरेदीकरिता पंधरा दिवसांकरिता २लाख रुपये घेतले होते. त्यानंतर पैसे व पत्नीचे सोन्याचे दागिने घरी ठेऊन ते कुटुंबासह कामानिमित्त मध्यप्रदेशात गेले होते. कपाटात ठेवलेले रोख २ लाख रुपये आणि सोन्याचे दागिने ज्यामध्ये २० ग्रॅमची सोन्याची चेन, १०,९ आणि ५ ग्रॅमच्या तीन अंगठ्या आणि १० ग्रॅमची सोन्याची पोत असा एकूण ३ लाख ६२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी झालेला दिसताच त्यांनी बडनेरा ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी गुन्हा दाखल करून चोरट्याचा शोध सुरू केला. पोलिसांनी विचारपूस केली असता त्याने चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याला लगेच अटक करून त्याच्या ताब्यातून चोरीचा मुद्देमाल जप्त केला.याकारवाईत पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात बडनेराचे ठाणेदार सुनील चव्हाण यांच्या नेतृत्वात प्रफुल्ल गिते, सहायक पोलीस निरीक्षक संदीप हिवाळे, पोलीस अंमलदार सुधीर प्रांजळे, रोशन निसर्ग, शशिकांत शेळके, विशाल पंडित, धनराज ठाकूर, मोहम्मद समीर, शुभम कडूकार आणि वचन पंडित यांचा समावेश होता.

# जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने मंडळ अध्यक्षांची बैठक

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संघटनात्मक तयारीला गती – बबलू देशमुख यांचे मार्गदर्शन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती** – आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस पक्षाने संघटनात्मक पातळीवर तयारी सुरू केली आहे. याचाच एक भाग म्हणून जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने मंडळ अध्यक्षांची महत्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत स्थानिक स्तरावर पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यावर जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी भर देण्यात आला.

सदर बैठक माजी मंत्री यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप, सुधाकरराव भारसाकळे, प्रदीपराव देशमुख,गिरीश कराळे यांच्या प्रमुख उपस्थित पार पडली, याशिवाय बैठकीला जिल्हा कॉंग्रेसचे पदाधिकारी, तालुका अध्यक्ष, शहर व ग्रामीण भागातील मंडळ अध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून कॉंग्रेस नेते बबलू देशमुख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, निवडणुका फक्त काही महिन्यांवर येऊन ठेपल्या असून, प्रत्येक कार्यकर्त्याने आपला मंडळ हा निवडणुकीचा किल्ला समजून कामाला लागले पाहिजे. मंडळ मजबूत तर मत मजबूत.ते पुढे म्हणाले की, कॉंग्रेस पक्षाची विचारधारा लोकशाही व सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी लढणारी आहे. ती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे काम मंडळ अध्यक्षांचे आहे. प्रत्येक प्रभाग, वॉर्ड, गाव पातळीवर कॉंग्रेसचा झेंडा अधिक भक्कमपणे फडकवण्यासाठी कामाला चालना देणे आवश्यक आहे.या बैठकीत मंडळ निहाय नियोजन, मतदार यादीतील तपशील, युवकांमध्ये जनजागृती, महिला सहभाग वाढविणे, सोशल मीडियाचा प्रभावी वापर यावरही चर्चा झाली. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा कॉंग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी संयुक्तरीत्या केले.शेवटी उपस्थित मंडळ अध्यक्षांनी संघटनेच्या आदेशानुसार पुढील कामकाजासाठी सज्ज असल्याची ग्वाही दिली.यावेळी प्रमोद दाळू, श्रीकांत बोंडे, निशांत जाधव, नामदेव तनपुरे, सहदेव बेलकर, महेंद्र गैलवार, समीर पाटील, प्रवीण सवयी, प्रदीप देशमुख, शरद भेटाळू, राहुल बोडके उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी शेतात पेरले चक्क भाजपचे झेंडे

## गांजा, अफूचे पीक घेण्यासाठी आता सरकारला साकडे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी १३८ किलोमीटरची पदयात्रा सुरू झाली आहे. देशाचे माजी कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव असलेल्या पापळ येथून सुरू झालेली ही पदयात्रा यवतमाळ जिल्ह्याकडे सरकत आहे. वाटेत सुकळी येथे शेतकऱ्यांनी शेतात चक्क भाजपचे झेंडे रोवून लक्ष वेधून घेतले आहे.

सुकळी येथील शेतकऱ्यांनी शेतात भाजपचे झेंडे लावून सरकारच्या विरोधात संताप व्यक्त केला असतानाच शेतात लावलेले फलक देखील लक्ष वेधून घेत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रीद्वय एकनाथ शिंदे, अजित पवार हे बैलगाडीवर बसल्याचे छायाचित्र या फलकावर आहे. आता पेरणी करणे बंद, गोरगरीब लोकांच्या जीवावर उठलेले म्होरके, आता एकतर गांजा, अफूचे पीक, नाहीतर पक्षाचे झेंडे, असा उल्लेख या फलकावर आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन सरकारनेच दिले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्यावेळी लाडकी बहीण योजना आणली त्यावेळी कोणती समिती गठीत केली काय? मग शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी समिती कशाला तयार करत आहेत, थेट घोषणाच केली पाहिजे, अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली.

# ड्राय डे ला महामार्गावरील बार मधून दिवसभर मद्यविक्री

## पोलीस कर्मचारीही झाले ग्राहकांमध्ये सहभागी पोलिसांच्या धाडसत्रापूर्वीच मद्यविक्री बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नांदगाव पेठ**

राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या न्यू किशन बार अँड रेस्टॉरन्ट मधून ड्राय डेच्या दिवशी खुलेआम देशी आणि विदेशी मद्यविक्री केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे ही विक्री केवळ एक, दोन तास नव्हे, तर चक्क सकाळी ११ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत सर्रासपणे सुरू होती. या काळात बार परिसरात ग्राहकांची मोठी वर्दळ होती.विशेष म्हणजे एका पोलीस कर्मचाऱ्यांनी कायदा धाब्यावर बसवून याच ठिकाणाहुन दोन विदेशी मद्याच्या बॉटल घेत या गुन्ह्यात सहभाग घेतला. रविवारी आषाढी एकादशी असल्यामुळे राज्यात ड्रायडे घोषित करण्यात आला होता.संपूर्ण राज्यात कायद्याने मद्यविक्रीवर बंदी असतांना न्यू किशन बारने या आदेशाला हरताळ फासत दिवसभर मद्यविक्री चालू ठेवली. या प्रकारामुळे प्रशासनाच्या



यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.या प्रकरणातील अधिक गंभीर बाब म्हणजे, नांदगाव पेठ पोलीस स्टेशनच्या एका पोलीस कर्मचाऱ्यानेच या बेकायदेशीर विक्रीला अप्रत्यक्ष पाठीशी घातल्याची माहिती आहे.

नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे ठाणेदार दहातोंडे यांना किशन बार चा अनधिकृत मद्यविक्री करणारा फोटो पाठविण्यात आला व संबधीत घटनेची माहिती देण्यात आली त्यांनतर त्यांनी लगेच काही पोलीस कर्मचारी घटनास्थळी पाठवले तर त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची मद्यविक्री होत नसल्याची माहिती पोलीस कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांना दिली. यावरून किशन बारच्या मालकाला धाड पडणार ही माहिती देखील आधीच मिळाली असल्याचा संशय बळावत आहे. ड्राय डेच्या दिवशी एवढ्या दीर्घकाळ मद्यविक्री चालू राहणे, स्थानिक पोलीस यंत्रणेच्या लक्षात न येणे, ही केवळ दुर्लक्षाची बाब नाही तर यामागे पोलिसांचा वरदहस्त असावा असा संशय निर्माण झाला आहे.या प्रकारामुळे स्थानिक जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.हा प्रकार गंभीर असून संबंधित बारचा परवाना रद्द करण्यात यावा व कायदा मोडणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर विभागीय चौकशी सुरू करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी जनतेतून केली जात आहे.

**दुप्पट भावाने केली मद्यविक्री**

न्यू किशन बारचा परवाना येण्याआधी याठिकाणी देशी विदेशी मद्यविक्री अनधिकृतपणे आणि तेजीत व्हायची पोलीसांना हाताशी धरून अनधिकृत मद्यविक्रीचा सम्राट बनलेल्या या बार मालकाने परवाना आल्यानंतर सुद्धा अनधिकृत मद्यविक्रीचा गोरखधंदा सुरूच ठेवलेला आहे.अमरावती पासून ते नांदगाव पेठ पर्यंत महामार्गावर न्यू किशन बार याठिकाणीच मद्यविक्री जोरात सुरू होती.ड्राय डे ला अन्यत्र मद्य मिळणे कठीण असल्याने या बार मधून दुप्पट भावाने विक्री करण्यात आली.

**रात्री १२ नंतर हॉटेल्स, बार सुरू**

राष्ट्रीय महामार्गावर रात्री १२ नंतर सुद्धा हॉटेल्स, बार खुलेआम सुरू असतात. पोलिसांचे गस्त वाहन रस्त्यावर उभे राहून रात्री ११ वाजता सायरन वाजवतात आणि त्यांनतर हॉटेल, बार कर्मचारी समोरचे लाईट बंद करून नंतर दोन वाजेपर्यंत ही हॉटेल आणि बार सुरूच असतात. प्रशासनाने या गंभीर प्रकाराकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

# भारती ताईंनी संत्रा मृग बहार मध्ये घेतली यशस्वी भरारी

## शेतकऱ्यांना सदैव निशुल्कपणे निस्वार्थपणे मार्गदर्शन करणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८चांदुर बाजार**

चांदूरबाजार तालुक्यातील करंजगाव महसूल मंडळातील खेल चौधर मौजेमध्ये भारती अरुणराव पोहोरकर यांनी एम कॉम शिक्षणासोबत शेतीचा सुद्धा परिपूर्ण अभ्यास केला. अभ्यास करता करता त्यांनी १८० रंगपुरी संत्र्याची कलमा लावली. त्यांच्या कुटुंबात भारतीताई आणि आई या दोघींचाच परिवार आहे. भारतीताईंनी पार्ट टाइम अकाउंटची काम करत असताना सुद्धा शेतीमध्ये काम करायची हयगय केली नाही. १ एकर ४ गुंठ्यामध्ये त्यांनी संत्र्याची झाड सात वर्षाची मोठी केली. त्या



अगोदर त्यांनी शेतीत मिरची कांदा अशी पिके घेतली. मध्यंतरी एप्रिल मे मध्ये संत्राच्या भरपूर बागा मृग बहारासाठी शेतकर्यांनी तानावर सोडल्या होत्या.अशातच एप्रिल व मे महिन्यामध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे भरपूर बागा मध्ये मृग बहार फुटू शकला नाही. पण भारतीताई या अवकाळी पावसा मुळे मृग बहार घेऊन यशस्वी ठरल्या. आज त्यांच्या प्रत्येक झाडावर मृगबहार फुटलेला दिसत आहे. आज त्यांची मृग बहार बाग व त्यांचे झाडाचे नियोजन पाहण्यासाठी शेतकरी दुरून येत आहे . त्या बोलताना शेवटी म्हणाल्या पुष्पक खापरे वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार ,चांदूरबाजार सिट्रस इस्टेट,कृषी विभाग चांदूरबाजार यांच्या वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन लाभल्यामुळे मी मृग बहार घेण्यास यशस्वी ठरली असल्याचे त्यांनी विदर्भ प्रजासत्ताक सोबत बोलतांना सांगितले.

> आज प्रत्येक महिलेने घरच्या शेतीत थोडेफार लक्ष देणे ही काळाची गरज आहे. मला शेतकरी वर्गाला यावर्षीच्या कठीण वातावरणात मृग बहार फोडण्याचे तंत्रज्ञान मार्गदर्शन देतांना खूप आनंद होत आहे. मी सदैव शेतीचे नवीन प्रयोग करताना शेतकर्यांना सदैव निशुल्कपणे निस्वार्थपणे मार्गदर्शन करणार.
>
> **भारती अरुणराव पोहोरकर करजगाव**

# भारतीय जनता पार्टी व युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने दहावी व बारावीच्या परीक्षेत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**




दरवर्षी प्रमाणे यंदाही दहावी व बारावीमध्ये गुणवत्ता यादीत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करण्याकरिता व त्यांचे मनोबल वाढविण्याकरिता भारतीय जनता पार्टी व युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने शनिवार दि.१२ जुलै २०२५ सकाळी १०.०० वाजल्यापासुन सांस्कृतिक भवन, अमरावती येथे भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्कार सोहळ्यामध्ये बडनेरा विधानसभा मतदार संघाचे आ.रवि राणा व भाजपा नेत्या नवनित राणा यांच्या हस्ते दहावी व बारावी परीक्षेत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा तसेच विविध क्षेत्रामध्ये कामगिरी करणाऱ्या खेळाडु तसेच विद्यार्थ्यांचा सत्कार होणार असुन या भव्य दिव्य सत्कार सोहळ्याला अमरावती जिल्ह्यातील अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार असल्याचे यावेळी आयोजकांद्वारे सांगण्यात आले.या सत्कार सोहळ्याला अमरावती जिल्ह्यातील राज्यसभा खासदार अनिल बोंडे, आ.प्रतापदादा अडसड, आ.प्रविण तायडे, आ.केवलराम काळे, आ.चंदु यावलकर, आ.राजेश वानखडे, भाजपा अध्यक्ष नितीन धांडे, भाजपा जिल्हा ग्रामिण अध्यक्ष रविराज देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर राहणार उपस्थित राहणार आहे.

# प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांच्या खात्यात अर्जित रजा जमा करा

## शिक्षणाधिकाऱ्यांनी निर्गमित केले पत्र, चंद्रशेखर भोयर यांच्या पाठपुराव्याने शिक्षकांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती**

प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांच्या खात्यात अर्जित रजा जमा होणार आहे. अमरावतीच्या शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख यांनी ४ जुलै रोजी यासंदर्भातील पत्र निर्गमित केले आहे. वरिष्ठ व निवड श्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या खात्यात अर्जित रजा जमा करण्यात याव्यात, यासाठी भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक व शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी शासकीय स्तरावर पाठपुरावा केला होता.

अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यात वरिष्ठ व निवड श्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण सुरू असून अनेक शिक्षकांनी



आपले प्रशिक्षण प्रामाणिकपणे पूर्ण केले आहे. परंतु या शिक्षकांच्या अर्जित रजेचा विषय प्रलंबित होता. अर्जित रजा शिक्षकांच्या खात्यात जमा व्हाव्यात आणि शिक्षकांना न्याय मिळावा, यासाठी चंद्रशेखर भोयर यांनी शासकीय स्तरावर पाठपुरावा केला. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आलेले आहे.शिक्षण उपसंचालकांनी अर्जित रजा शिक्षकांच्या खात्यात जमा करण्यासंदर्भात पाचही जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकार्यांना एका पत्राद्वारे निर्देशित केले आहे.यापत्राच्या अनुषंगाने अमरावतीच्या शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख यांनी संस्था अध्यक्ष व सचिव तसेच मुख्याध्यापक व प्राचार्य यांच्या नावे एक पत्र निर्गमित करीत अर्जित रजा जमा करण्याचे निर्देश दिल्याने शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# राज्यातील ११ आदिवासी प्रकल्पांना स्वतंत्र प्रकल्प अधिकारी केव्हा?

## मेळघाट ते गडचिरोलीत दुहेरी पदभार योजनांना कसा मिळणार न्याय ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ चिखलदरा**

राज्यातील ११ आदिवासी प्रकल्प कार्यालयांमध्ये मागील ३० वर्षांपासून आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे तेथील प्रकल्प अधिकारी व एसडीओ, असे दोन कारभार असल्याने दोन्ही विभागांना न्याय दिला जात नसल्याचे चित्र आहे. यामुळे स्वतंत्र अधिकारी देण्याची मागणी मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री शिंदे यांच्या कार्यकाळात आदिवासी आमदार-खासदारांनी मागणी करताच झालेला निर्णय गुंडाळला का, असा सवाल यानिमित्त पुढे आला आहे.

गतवर्षी मुंबई येथे जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठकीत तत्कालीन मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत याबाबत घेण्यात आला होता. तत्कालीन दोन्ही उपमुख्यमंत्र्यांपुढे राज्यातील आमदार व खासदारांनी हा प्रश्न मांडला होता. तत्कालीन विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, माजी आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, माजी अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्यासह आदिवासी क्षेत्रातील खासदार-आमदार उपस्थित होते. परंतु, दीड वर्षे लोटूनही अंमलबजावणी अजूनही झाली नाही.

राज्यातील आदिवासी भागांमध्ये बालमृत्यू रोखण्यासाठी न्यायालयाच्या एका निर्देशानुसार भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांना प्रकल्प अधिकाऱ्याचा पदभार स्वतंत्र देण्याचे आदेश होते. त्यानुसार आयएएस अधिकारी दिले गेले. त्यांना शासनाने एसडीओचेही कामकाज सोपविले.

**राज्यात या ११ ठिकाणी दुहेरी कारभार**

राज्यातील पांढरकवडा, धारणी, अहेरी, भामरागड, किनवट, नाशिक, गडचिरोली, तळोदा, घोडेगाव, देवरी व चंद्रपूर या ११ एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयाचा कारभार तेथीलच आयएएस असलेल्या उपविभागीय अधिकाऱ्यांकडे मागील किमान ३० वर्षापासून आहे.

# जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी 'आय गॉट कर्मयोगी'उपक्रम

## पाच अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सक्ती, अन्यथा वेतनवाढ रोखणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

जिल्हा परिषदेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम व कर्तव्याप्रती उत्तरदायी करण्यासाठी 'आय गॉट कर्मयोगी' हा नवा उपक्रम पुढे आणण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना ५ नवे अभ्यासक्रम पूर्ण करावयाचे आहे. हे अभ्यासक्रम पूर्णपणे यशस्वी न केल्यास त्यांची वेतनवाढ रोखण्याचे सीइओ संजीता महापात्र यांचे निर्देश आहेत.

जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा हा नवा उपक्रम शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या निर्देशानुसार लागू करण्यात आला आहे. या प्रशिक्षण पोर्टलवरील विविध अभ्यासक्रमांपैकी किमान ५ अभ्यासक्रम पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या



प्रशिक्षणाचे उद्दिष्ट शासकीय सेवकांचे कौशल्यवृद्धीकरण आणि कार्यक्षमता सुधारणा असे ठेवण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, ज्या शासकीय कर्मचाऱ्यांनी १५ जुलैपर्यंत 'आय गॉट' (आयजीओटी) पोर्टलवरील किमान ५ प्रशिक्षण कोर्सेस पूर्ण करून त्याचा अहवाल संबंधित विभागप्रमुख, गटविकास अधिकारी, कार्यालय प्रमुख यांच्याकडे सादर केलेला नसेल, त्यांची वेतनवाढ १ जुलै २०२५ पासून थांबविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर, सर्व संबंधित विभागप्रमुखांनी आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सदर सूचना तात्काळ कळवून प्रशिक्षण पूर्ण करून घेण्याची कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. हा आदेश शासनाच्या डिजिटल प्रशासन व लोकसेवा सुधारणा धोरणाशी सुसंगत असून, आय गॉट कर्मयोगी पोर्टलवर उपलब्ध विविध कौशल्याधारित कोर्सेसमुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेत अधिक सक्षम होण्याची संधी उपलब्ध होत आहे.

# परिवहन खात्याच्या ५१ मोटार वाहन निरीक्षकांना 'मॅट'मध्ये दिलासा; बदलीसंदर्भात निर्णय केव्हा?

## प्रादेशिक परिवहन विभागाचा कारभार ढेपाळला, ऑनलाइन बदली प्रक्रियेत त्रुटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

राज्याच्या परिवहन खात्याने मे महिन्यात मोटार वाहन निरीक्षकांची ऑनलाइन बदली प्रक्रिया राबविली असली तरी यात प्रचंड त्रुटी, अनियमितता झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. परिणामी, या बदली प्रक्रियेविरुद्ध ५१ वाहन निरीक्षकांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट)कडे धाव घेत २७ मे २०२५ रोजी दिलासा मिळविला. मात्र, ४० दिवसांनंतरही वाहन निरीक्षक हे अद्यापही 'वेट ण्ड वॉच' आहेत. त्यामुळे परिवहन खात्याचा कारभार कसा चालतो, हे स्पष्ट होते.




परिवहन खात्याने पारदर्शकपणाच्या नावावर २८ जून २०२३ रोजी ऑनलाइन बदलीची प्रक्रिया सुरू केली. यात समुपदेशनात गट 'अ', 'ब' आणि 'क' वर्गवारीनुसार बदली प्रक्रिया राबविणे अपेक्षित होते. मात्र, यंदा ऑनलाइन बदली प्रक्रियेची 'एसओपी' तयार न करता परिवहन खात्याने पारदर्शकतेलाच छेद दिल्याचा आरोप वाहन निरीक्षकांनी केला आहे. ही बाब मोटार वाहन निरीक्षकांनी 'मॅट'मध्ये पुराव्यानिशी सिद्ध केली. त्यामुळे 'मॅट'ने एकाच वेळी ५१ वाहन निरीक्षकांच्या बदली प्रक्रियेला स्थगनादेश देत प्रादेशिक परिवहन आयुक्तांना याविषयी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले होते. परंतु, २७ मे ते ७ जुलै २०२५ या ४० दिवसांत वाहन निरीक्षकांच्या बदली प्रक्रियेसंदर्भात कोणतीही दखल घेण्यात आली नाही, तर दुसरीकडे अन्यायग्रस्त मोटार वाहन निरीक्षक नव्याने पदस्थापनेच्या प्रतीक्षेत आहेत.

परिवहन आयुक्त कार्यालयाने २०२३ मध्ये मोटार वाहन निरीक्षकांच्या बदल्या ऑनलाइन करण्याचे निकष जाहीर केले. यात कायदेशीर त्रुटी व दोषांकडे दुर्लक्ष करण्यात आल्याची बाब 'मॅट'च्या निदर्शनास आणून दिली. परिणामी, 'मॅट'ने परिवहन आयुक्तांना मोटार वाहन निरीक्षकांची 'अ', 'ब', 'क' या वर्गवारीनुसार यादी प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करावी, असे निर्देशित केले. असे असताना परिवहन आयुक्तांकडून प्रतिज्ञापत्र सादर करण्यास विलंब होत आहे.

> 'मॅट'च्या निर्देशानुसार मोटार वाहन निरीक्षकांच्या बदल्यांसंदर्भात उत्तर पाठविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रतिज्ञापत्र लवकरच सादर केले जाईल. मध्यंतरी आजारी असल्यामुळे मी सुटीवर होतो, याबाबत थोडा विलंब झाला आहे.
>
> **– संजय मेत्रेवार, सहआयुक्त (सामान्य प्रशासन) परिवहन विभाग, मुंबई.**

# भाजपाचे माजी मंत्री जगदीश गुप्ता यांचा कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती**

अमरावतीचे भाजपाचे माजी मंत्री जगदीश गुप्ता यांच्यासह माजी महापौर, ३ माजी स्थायी समिती सभापती, माजी विरोधी पक्ष नेता आणि ७ माजी नगरसेवकांनी आज शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी माजी खासदार आनंदराव अडसूळ, कॅप्टन अभिजीत अडसूळ, प्रिती बंड, शिवसेना सचिव राम रेपाळे आदी उपस्थित होते. आजच्या पक्ष प्रवेशाने अमरावती जिल्ह्यात शिवसेना मजबूत झाली असून उबाठाला खिंडार पडले आहे.




माजी मंत्री जगदिश गुप्ता हे दोन वेळा विधानसभेचे आणि दोन वेळा विधान परिषदेचे सदस्य राहिले आहेत. ते अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री होते. त्यांच्यासोबत माजी महापौर नितीन वानखेडे, माजी स्थायी समिती सभापती नितीन चांडक, राजू राठी, विलास रोंधे, माजी विरोधी पक्ष नेता सुरेंद्र पोपली यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. त्याचबरोबर मनीष जोशी, सुभाष रत्नपारखी, प्रशांत महाजन, अनिल कडू, भास्कर मानमोडे, वासुदेव देऊळकर, डॉ. राजेश जयपूरकर या ७ माजी नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. अग्रवाल समाजाचे विदर्भ प्रदेश अध्यक्ष किशोर गोमंतका, खामगाव अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष मनोज खंडेलवाल, मराठा महासंघाचे अमरावती अध्यक्ष गणेशराव रेखे, शाहुसमाजाचे अमरावती अध्यक्ष रामचंद्र गुप्ता यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला.

शिवसेना हा काम करणारा पक्ष आहे. लोकांच्या अडअडचणीला धावून जाणारा पक्ष अशी शिवसेनेची ओळख आहे. घरी बसून सरकार चालवता येत नाही, असा टोला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठाला लगावला. आजच्या पक्ष प्रवेशामुळे शिवसेना अमरावती जिल्ह्यात मजबूत झाली आहे. अमरावती हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे, असे ते म्हणाले. अडीच वर्ष मुख्यमंत्री असताना कल्याणकारी योजना राबवल्या. त्यामुळे राज्यातील मतदारांनी महायुतीला ऐतिहासिक बहुमत दिले, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

यावेळी पालघर जिल्ह्यातील एकता वाहतूक संघटनेचे अध्यक्ष अमोल पाटील, उपाध्यक्ष भावेश संख्ये, प्रतीक जोशी, सुमीत बारी, मारुती आव्हाड, सोहम राजपूत यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते एकता वाहतूक संघटनेच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले.

# १० जुलैपासून आता आठ तास आगोदर रेल्वे आरक्षण चार्ट पहावयास मिळणार

## सर्व प्रवासी गाड्यांसाठी आठ तास आधी प्रथम आरक्षण चार्ट तयार करण्याची प्रक्रिया सुरु

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

रेल्वेतील आरक्षणाचा चार्ट सध्या गाडी रवाना होण्याच्या चार तास आधी तयार केला जातो. यामुळे प्रवाशांच्या मनात प्रवासाच्या नियोजनाबाबत अनिश्चितता निर्माण होते. ही अनिश्चितता दूर करण्यासाठी रेल्वे मंडळाने प्रवासाच्या आठ तास आधी आरक्षण चार्ट तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची अंमलबजावणी येत्या १० जुलैपासून करण्यात येणार असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

सर्व प्रवासी गाड्यांसाठी आठ तास आधी प्रथम आरक्षण चार्ट तयार करण्याची प्रक्रिया १० जुलैपासून अनिवार्य करण्यात आली आहे. गाड्यांचे प्रस्थान वेळ ०५:०० ते १४:०० वाजेपर्यंत प्रथम आरक्षण चार्ट मागील दिवशी रात्री २१:०० वाजेपर्यंत तयार करण्यात येईल. गाड्यांचे प्रस्थान वेळ १४:०० ते २३:५९ वाजेपर्यंत व ००:०० ते ०५:०० वाजेपर्यंत असल्यास प्रथम आरक्षण चार्ट प्रस्थानाच्या आठ तास आधी तयार करण्यात येईल. दुसरा आरक्षण चार्ट तयार करण्याच्या विद्यमान प्रावधानांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



आठ तास आगोदर आरक्षण चार्ट तयार करण्यात येणार असल्याने प्रवाशांना अगोदरच नियोजन करणे सोपे जाईल. वर्तमान आरक्षण कोटा गाडीच्या प्रस्थानाच्या आठ तास आधी उपलब्ध असेल. प्रवाशांना त्यांच्या तिकिटाची स्थिती (कन्फर्म/वेटिंग/रद्द) लवकर समजू शकेल. काही वेळा एक दिवस आधी देखील ते स्पष्ट होईल. त्यामुळे पुढील नियोजन करणे सुलभ होईल. फक्त निश्चित तिकीटधारकच प्लॅटफॉर्मवर येतील. त्यामुळे फलाटावरील गर्दी कमी होईल आणि स्वच्छता राखण्यात मदत होईल. ही सुधारणा प्रवाशांना अंतिम क्षणी मिळणाऱ्या तिकिटांबाबत अधिक स्पष्टता व पारदर्शकता मिळवून देण्यासाठी करण्यात आल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले.


सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा ८६०५९४८८५३



# सण, उत्सवाच्या महिन्याला २५ पासून सुरुवात

## श्रावण सोमवार, नागपंचमी, स्वातंत्र्यदिन, रक्षाबंधन अशा सणांची रेलचेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती**

आषाढी एकादशी आटोपली की, भाविकांना सण, उत्सवांचा महिना श्रावणाची चाहुल लागते. यंदा गुरुवार, २४ जुलैला आषाढ आमावस्या आटोपली की, २५ जुलैपासून श्रावण महिन्याला सुरुवात होणार आहे. या महिन्यात सृष्टीला जसा पाना, फुलांनी बहर येतो, त्याचप्रमाणे सण-उत्सवांचीही चंगळ राहणार आहे. चारही श्रावण सोमवारी शहरातील गडगडेश्वर, तपोवनेश्वर, कोंडेश्वर, पाताळेश्वर, भुतेश्वर तसेच इतर लहान, मोठ्या मंदिरांमध्ये महादेवाच्या दर्शनासाठी गर्दी होणार असून, उत्साह, लहान यात्रा असे धार्मिक वातावरण राहणार आहे. शिवलिंगाचा शृंगार, बिल्वपत्रांचा अभिषेक, महाआरती, पूजा असे विधी पार पाडले जाणार आहेत.

श्रावण शुद्ध पंचमी अर्थात नागपंचमीला मंदिरांसह घरोघरी नागदेवतेची पूजा होणार असून लाह्या, फुटाणे, वटाणे, करंजीचा फुलोरा, हलव्याचा प्रसाद घरोघरी करून त्याचे वितरण केले जाणार आहे. दरम्यान सुवासिनी श्रावणातील दर मंगळवारी मंगळागौरीचे व्रतही करतील. ८ ऑगस्टला नारळी पौर्णिमा तसेच ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाचा सण साजरा होणार आहे. बहीण भावाच्या मनगटावर प्रेमाचे अतूट रेशमी बंध बांधून त्याला नेहमी रक्षण करत राहा, अशी गळ घालणार असून, या दिवशी बहिणी भावाच्या घरी किंवा भाऊ बहिणींच्या घरी जाऊन हातावर राखी बांधतील. शुक्रवार १५ रोजी राष्ट्रीय उत्सव स्वातंत्र्य दिन शासकीय कार्यालये तसेच शाळा, महाविद्यालयांसह विविध ठिकाणी साजरा होणार असून, याच दिवशी श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त घरोघरी श्रीकृष्णाचा पाळणा, मूर्तीचे पूजन होणार आहे. शहरातील श्रीकृष्ण मंदिरांसह इस्कॉन मंदिरात याप्रसंगी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी गोपाळकाला व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.



श्रावण महिन्यातील पिठोरी अमावास्या २२ ऑगस्ट रोजी असून, या दिवशी जिल्ह्यात पोळ्याचा सण साजरा होणार आहे. पोळ्याला बैलजोड्यांना सजवून पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण केला जाणार आहे. पोळा या सणाला मराठी श्रावण महिन्याचा समारोप होत असतो. तान्हा पोळ्याला मातीसह लाकडी बैलांची पूजा केली जाणार आहे. अशाप्रकारे संपूर्ण महिन्यात सण, उत्सव, व्रत, वैकल्ये केली जातात.

श्रीकृष्ण जन्माष्टमी कावड यात्रेचीही राहणार धूम श्रावण महिन्यात श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त शहरात तीन मोठ्या दहिहंडीचे आयोजन केले जाते. युवा स्वाभिमान, मनसे, शिवसेनेद्वारे (शिंदे गट) तीन मोठ्या दहिहंडीचे आयोजन होत असते. यानिमित्त शहरात सिने अभिनेते, पुढाऱ्यांचे आगमन होत असते. दहिहंडीच्या निमित्ताने शहरात उत्साहाला उधाण येते. तसेच दर श्रावण सोमवारी कावड यात्रेचेही मोठे वाजत गाजत शिवालयांमध्ये आगमन होत असते. कावड यात्रेतील देखावे बघण्यासाठी भाविकांची शिवालयांसह रस्त्यांवरही चांगलीच गर्दी होत असते.

# ३ हजार फुट उंचावरुन पाहता येणार चिखलदराचं विहंगम दृष्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८चिखलदरा**

चारही बाजूंनी हिरवागार जंगल, खोल दरी, आणि उंच पहाड हे चिखलदराचं अतिशय सुंदर दृष्य पक्षांप्रमाणे आता पर्यटकांना जमिनीपासून तीन हजार फूट उंच आकाशातून पाहण्याचा आनंद घेता येणार आहे. चिखलदराचं हे विहंगम दृष्य पर्यटकांना अनुभवता यावं, यासाठी खास पॅरामोटरिंगची सुविधा चिखलदरा येथे करण्यात आलीय.

खोल दरीमध्ये उतरणं आणि उंच पहाड चढणं, असे थरारक अनुभव घेण्यासाठी साहसी पर्यटक नियमित चिखलदरासह मेळघाटात येतात. पॅरामोटरिंगमुळं आता साहसी पर्यटकांना भीमकुंड येथील खोल दरी, गाविलगड किल्ला, स्कायवॉक पॉइन्ट, चिखलदरा शहर आणि येथील जंगल हे सारं उंच आकाशातून पाहण्याची मजा लुटता येणार आहे. वन विभागाच्या सहकार्यानं चिखलदरा येथे पर्यटकांना भुरळ पडणाऱ्या पॅरामोटरिंगची सुविधा उपलब्ध झाली असल्याची माहिती पॅरामोटरिंगचे पायलट आशिष तोमर यांनी सांगितले.

उन्हाळ्यात मेळघाटच्या जंगलात सतत लागणाऱ्या आगीवर नियंत्रण आणण्यासाठी २०१३ मध्ये मेळघाट व्याघ्र प्रकलाचे विभागीय वन अधिकारी



विशाल माळी यांनी आशिष तोमर यांच्यामध्यमातून पहिल्यांदा मेळघाटात ड्रोन कॅमेराद्वारे जंगलाचं निरीक्षण केलं. याबाबत आशिष तोमर यांनी सांगितलं की, त्यावेळी जंगल जाळणाऱ्यांवर कारवाई व्हायला लागली. जंगल कुठं जळत आहे, हे तत्काळ कळायला लागलं. त्यामुळं एकूणच मेळघाटात ड्रोनचा वापर व्हायला लागल्यानं जंगलातील आगीचं प्रमाण घटलं. त्यानंतर जंगलातील प्राण्यांवर लक्ष ठेवण्यासाठी आम्ही ड्रोनचा वापर केला, असं आशिष तोमर यांनी म्हटलं आहे.

पॅरामोटरिंगचे पायलट असणारे आशिष तोमर हे मूळचे परतावाडा येथील रहिवासी असून त्यांनी मुंबईत चित्रपटसृष्टीत स्टील फोटोग्राफर म्हणून काम केलंय. नो एन्ट्री, प्रेमाची गोष्ट अशा काही चित्रपटांसाठी स्टील फोटोग्राफी त्यांनी केलीय. इटलीमध्ये सुद्धा एका लग्नाचा इव्हेंट त्यांनी शूट केला. यासोबतच इटलीतील नैसर्गिक सृष्टी त्यांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपलीय. दरम्यान, आता वन विभागाच्या सहकार्यानं मेळघाट पॅरामोटरिंगची नवी संधी मिळाली आहे. तसंच चिखलदरामध्ये साहसी आनंद लुटण्याची पर्यटकांना देखील नवी संधी उपलब्ध झालीय, याचा आनंद देखील आशिष तोमर यांनी व्यक्त केलाय.

# उद्याला शिक्षक, कर्मचारी यांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर हल्ला बोल आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

उद्या बुधवार दि. ९ जुलै २०२५ रोजी देशातील प्रधान ११ कामगार संघटनांच्या वतीने देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे. राज्यस्तरावरील आपल्या मागण्यांबाबत गेली २ वर्षे संघटनात्मक सततचे प्रयत्न करीत आहोत. एकीचे बळ जपण्यासाठी देशव्यापी संप आंदोलनात सहभागी होणे आपल्याला आवश्यक होते. परंतु आपल्याला राज्यस्तरावरील मागण्यांसाठी, तीव्र आंदोलन आसपासच्या कालावधीत करावे लागणार आहे. या बार्बीचा सर्वंकष विचार करुन बुधवार दिनांक ९ जुलै २०२५ रोजी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेऊन जिल्हाधिकाऱ्यांमार्फतमुख्यमंत्र्यांना उद्देशून लिहिलेले निवेदन सादर करणे, अशी संघटनात्मक कृती उपरोक्त आभासी सभेत ठरविण्यात आली. यावेळी घेण्यात येणाऱ्या सभेत आजच्या देशव्यापी संपास पाठिंबा देखील व्यक्त करावयाचा आहे. अमरावती शहारत शिक्षकांचा हा मोर्चा इर्विन चौक येथून दुपारी १ वाजता निघणार निघणार आहे.

जिल्हा स्तरावरील मध्यवर्ती संघटनेचे पदाधिकारी व सर्व घटक संघटनांचे नेतेगण यांनी उपरोक्त उपक्रम परिणामकारकरित्या, यशस्वी करावा,अशी विनंती या मोर्चामध्ये सर्व राज्य, विभागीय, जिल्हा, शहर, तालुका शाखा पदाधिकाऱ्यांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन संघटने मार्फत करण्यात आले आहे.

# गवळीपुरा येथे ६ तलवारी, ११ चाकू, १ कोयता सह दोघांना अटक: गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट २ ने गवळीपुरा भागात सराईत गुन्हेगाराच्या घरावर कारवाई करत मोठा शस्त्रसाठा जप्त केला आहे. पोलिसांनी ६ तलवारी, ११ चाकू व १ कोयता हस्तगत केला असून, दोघांना अटक केली असून एक आरोपी फरार आहे. ही धाडसी कारवाई शेख रहीम उर्फ उंगा शेख आमद व त्याचा भाऊ शेख जमीर शेख आमद यांच्या राहत्या घरी करण्यात आली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये शेख नाजीम शेख रहीम उर्फ उंगा (गवळीपुरा) आणि गुलवेज अहमद नूर अहमद (रा. जुनी वस्ती, बडनेरा) यांचा समावेश आहे. तर शेख जमीर उर्फ बाबा शेख आमद हा फरार असून, त्याचा शोध सुरू आहे.या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, अमरावती शहरातील अवैध शस्त्रसाठ्याच्या विरोधात पोलिसांची ही ठोस मोहीम ठरत आहे. पुढील तपास गुन्हे शाखा युनिट २ करत आहे.

